बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ३९ | बुधवार, दि.४ सप्टेंबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# महाराष्ट्राची विकासयात्रा वेगाने पुढे जात राहील-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

## "विधानपरिषद शतकमहोत्सवा'निमित्त राष्ट्रपतींच्या हस्ते "वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व' ग्रंथाचे प्रकाशन तसेच उत्कृष्ट संसदपटूफव "उत्कृष्ट भाषण'पुरस्कारांचे वितरण

**मुंबई :** महिलांच्या सहभागा शिवाय कोणतेही राष्ट्र, राज्य गतीमान प्रगती करु शकत नाही, या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवत आहे, ही अभिनंदनीय बाब आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) महाराष्ट्राचं देशात पहिलं स्थान असून महाराष्ट्राची विकासयात्रा अशीच वेगाने पुढे जात राहील, असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केला.

"महाराष्ट्र विधान परिषद शतक महोत्सवा' निमित्त विधीमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते "वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व' या ग्रंथाचे प्रकाशन तसेच "उत्कृष्ट संसदपटू' आणि "उत्कृष्ट भाषण' पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी श्रीमती मुर्मू बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या की, देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे मोठे योगदान असून विविध महत्वपूर्ण ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार राहीलेल्या महाराष्ट्रांने देशात अनेक कायदे, सुधारणांची मुहूर्तमेढ रोवली आहे. वीरमाता जिजाऊ यांची धरती असलेल्या आणि स्त्री शिक्षणाची सुरवात करणारे महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, संसदीय लोकशाहीवर मार्गक्रमण करत असेलल्या भारताला घटना देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, यासारख्या महान विभूतींचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्र विधानपरिषदेचा शतकमहोत्सव साजरा होत असल्याबद्दल सर्व महाराष्ट्रातील जनतेचे, लोकप्रतिनिधींचे अभिनंदन करुन राष्ट्रपती पुढे म्हणाल्या की, विधान परिषद सभागृहाच्या स्थापनेपासून आत्तापर्यंत अनेक दिशादर्शक नियम, कायदे यांची निर्मिती केली आहे. जे पुढे देशपातळीवर स्वीकारण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने वि.स.पागे यांनी दिलेला रोजगार हमी योजनेस-ारखा लोकोपयुक्त कायदा ही याच विधीमंडळाची देण आहे. देशाच्या लोकसभेचे पहिले अध्यक्ष ग.वा.म ावळणकर हे याच विधान परिषदेचे सदस्य होते तर देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभा पाटीलही याच विधीमंडळाच्या सदस्य राहिलेल्या आहेत. विविध महत्व-पूर्ण निर्णय, कायदे करण्यासोबतच लोकांच्या आशाआकांक्षा पूर्ण करण्यासाठी हे विधीमंडळ काम करत आहे. या माध्यमातून जबाबदार वरिष्ठ सभागृहाची भूमिका यशस्वीपणे बजावत देशाच्या संसदीय प्रणालीत महाराष्ट्र विधीमंडळाने स्वतःची ओळख निर्माण केली आहे, असे सांगून विधान परिषदेच्या शतकपूर्तीच्या वाटचालीचा आढावा घेणारा संदर्भ ग्रंथ प्रकाशित केल्याबद्दल तसेच या ग्रंथात तत्कालीन बॉम्बे



विधान परिषदेच्या पहिल्या महिला उपसभापती श्रीमती जेठी सिप-ाहीमलानी यांच्यावर सविस्तर माहिती देणारे प्रकरण ठेवल्या बद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अभिनंदन केले. महाराष्ट्राच्या प्रशासनाच्या मुख्य पदावर महिला अधिकारी तर पोलिस प्रशासनाच्याही प्रमुख पदावर महिला अधिकारी सक्षमपणे कार्यरत आहे, ही निश्चितच अभिनंदनीय बाब असून महाराष्ट्र ाच्या लेकी निश्चितपणे देशाचा गौरव वाढवतील, असं प्रतिपादन राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांनी केलं.

### महाराष्ट्र भक्ती, शक्ती आणि प्रगतीची भूमी- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

महाराष्ट्राला संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदास यासारख्या महान संताची परंपरा लाभली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या पावन भूमीत हिंदवी स्वराज्याचा पाया रचला. त्यांच्या कार्यामुळे देशाची जगात ओळख आहे. छत्रपतींच्या शौर्याचा प्रत्येक भारतीयाला सार्थ अभिमान असून प्रत्येकाच्या मनात त्यांची अमीट छाप आहे. महाराष्ट्र भक्ती, शक्ती आणि प्रगतीची भूमी आहे. असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्र विधान परिषदेचे राज्याच्या विकास कार्यात मोठे योगदान आहे. महाराष्ट्र विधिमंडळात मांडलेली रोजगार हमी योजनेची संकल्पना राष्ट्रीय स्तरावर स्वीकारली गेली. दुष्काळी परिस्थितीचा सामना करत असलेल्या लाखो गरजूंना सहायक ठरणारा हा क्रांतिकारी निर्णय लोकशाही इतिहासातील एक अद्वितीय उदाहरण आहे. साम ाजिक आणि राजकीय सौहार्दासाठी महाराष्ट्र ओळखला जातो. या शतक महोत्सवानिमित्त उत्कृष्ट संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन केल्याबद्दल अभिनंदन करुन राज्यपालांनी यांनी पुरस्कार विजेत्या सदस्यांचे अभिनंदन केले.

### महिला सक्षमीकरणासाठी शासन कृतीशील-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

अतिशय संघर्षमय वाटचाल करत आज देशाच्या राष्ट्रपती असलेल्या द्रौपदी मुर्मू यांची वाटचाल सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, की म हिलांच्या सक्षमीकरणासाठी शासन उपयुक्त निर्णय, महत्वाच्या योजना राबवत असून मोठ्या प्रमाणात त्याची अंमलबजावणी राज्यात सुरु आहे. महिलांना आर्थिक सहाय्य करणारी "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना' सुरु झाली असून महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. या अंतर्गत आतापर्यंत दीड कोटी पेक्षा अधिक महिलांना लाभ मिळाला आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणारी लखपती दिदी योजना, शासकीय कागदपत्रांवर आपल्या नावाच्या पुढे आईचे नाव लावण्याचा निर्णय तसेच लेक लाडकी योजना, मुलींना व्यावसायिक शिक्षणात मोफ्फत शिक्षणाची संधी, यासोबतच महिलांसाठीच्या अनेक उपयुक्त योजना राज्य शासन राबवत आहे. एका बाजूला विकास साधताना दुस-या बाजूला कल्याणकारी योजनांची जोड देत महिला सक्षमीकरणाला बळकटी देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

### सक्षम लोकशाहीसाठी महाराष्ट्र विधीमंडळाचे यो-गदान उल्लेखनीय - विधानसभा अध्यक्ष ॲड.राहूल नार्वेकर

महाराष्ट्र विधीमंडळाला गौरवशाली परंपरा असून येथील अनेक सदस्यांनी विधीमंडळ काम काजात भरीव योगदान दिले आहे. आज राष्ट्रपतींच्या उपस्थितीत होत असेलला विधानपरिषद शतकमहोत्सवी सोहळा या परंपरेच्या शिरपेचात मानाचा तुरा असल्याचे सांगून विधानसभा अध्यक्ष ॲड.नार्वेकर म्हणाले की, विधीमंडळाच्या कार्यपद्धतीत कालानुरुप अनेक बदल करण्यात येत असून कृत्रिम बुद्धिमता तसेच माहिती तंत्रज्ञान कार्यप्रणालीचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. देशाच्या संसदीय कार्यपद्धतीत महाराष्ट्राच्या विधीम ंडळाची ठळक ओळख असून या सर्वांचा आढावा घेणारा हा संदर्भ ग्रंथ सर्व संबंधितांना मार्गदर्शक ठरणारा आहे, असे सांगितले.

### सदस्य, अभ्यासक, संशोधकांसाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथाची निर्मिती -उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे

विधानपरिषदेच्या शतकम होत्सवी सोहळ्यात राष्ट्रपतींची उपस्थिती ही या सभागृहाच्या वारश्याला अधिक संपन्न करणारी ऐतिहासिक घटना असल्याचे सांगून उपसभापती डॉ.नीलम गो?हे म्हणाल्या की, विधान परिषदेने वरिष्ठ सभागृह म्हणून या शंभर वर्षांत राज्याच्या विकासात उल्लेखनीय योगदान दिलेले आहे. या सर्वांचा परामर्श घेणारा सर्वंकष संदर्भ ग्रंथ प्रकाशित होत आहे, याचा मनस्वी आनंद आहे. यामध्ये सहकार्य केलेल्या संपादकीय मंडळाचे त्यांनी अभिनंदन केले. वरिष्ठ सभागृह म्हणून राज्याच्या मूलभूत प्रश्नांना वाचा फ्फोडत असतानाच आवश्यक विषयांवर चर्चा, कायदे निर्मीतीचे महत्व-ाचे कार्य या सभागृहाने गेल्या शतकापासून केलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने रोजगार हमी योजना, एकाधिकार कापूस खरेदी योजना, महिला आयोग, देवदासी संरक्षण कायदा, पंचायत राज, रँगिग विरोधी कायदा, अल्पसंख्याक आयोग, डान्सबार बंदी विधेयक, ,शालेय शिक्षणात मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय, यासारखे देशपातळीवर उल्लेखनीय ठरलेले निर्णय घेतले असून या सर्वांचा परामर्श या संदर्भ ग्रंथात घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी मंत्रीमंडळातील सदस्य, तसेच माजी आजी सदस्य, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात आणि सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

### "उत्कृष्ट संसदपटू' आणि "उत्कृष्ट भाषण' पुरस्कारांचे वितरण यावेळी करण्यात आले; वर्षनिहाय पुरस्कार विजेत्या सदस्यांची नावे पुढील प्रमाणे -

सन २०१८-१९ विधानसभा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार - सदस्य सर्वश्री बाळासाहेब थोरात, डॉ. संजय कुटे उत्कृष्ट भाषण पुरस्कार -विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, विधानसभा सदस्य पराग अळवणी.

विधान परिषद उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार- उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सदस्य निरंजन डावखरे. उत्कृष्ट भाषण पुरस्कार - हुस्नबानू खलिफे, सुजितसिंह ठाकूर.

सन २०१९-२० विधानसभा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार-सदस्य प्रकाश आबिटकर, आशिष शेलार.

उत्कृष्ट भाषण पुरस्कार - सदस्य सुनील प्रभू, दिलीप मोहिते-पाटील.

विधान परिषद उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार - सतीश चव्हाण, अनंत गाडगीळ.

उत्कृष्ट भाषण पुरस्कार - राम हरी रूपनवार, श्रीकांत देशपांडे.

सन २०२०-२१ विधानसभा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार - अमित साटम, आशिष जयस्वाल.

उत्कृष्ट भाषण पुरस्कार - प्रताप सरनाईक, प्रकाश सोळंके.

विधान परिषद उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार - सदस्य प्रवीण दरेकर, दिवंगत सदस्य विनायक मेटे.

उत्कृष्ट भाषण पुरस्कार सदस्य - मनीषा कायंदे, बाळाराम पाटील.

२०२१-२२ विधानसभा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार - सदस्य संजय शिरसाट, प्रशांत बंब.

उत्कृष्ट भाषण पुरस्कार - सदस्य सरोज अहिरे, सिद्धार्थ शिरोळे.

विधान परिषद उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार-सदस्य अनिकेत तटकरे, सदाभाऊ खोत,

उत्कृष्ट भाषण पुरस्कार - गोपीकिशन बाजोरिया, विक्रम काळे

सन २०२२-२३ विधानसभा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार - सदस्य भरत गोगावले, चेतन तुपे, समीर कुणावार. उत्कृष्ट भाषण पुरस्कार - सदस्य यामिनी जाधव, अभिमन्यू पवार.

विधान परिषद उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार - सदस्य प्रसाद लाड, महादेव जानकर.

उत्कृष्ट भाषण पुरस्कार - सदस्य बाबाजानी दुर्राणी, प्रज्ञा सातव.

सन २०२३-२४ विधानसभा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार - सदस्य रमेश बोरनारे, अमिन पटेल, राम सातपुते.

उत्कृष्ट भाषण पुरस्कार - सदस्य कुणाल पाटील, श्वेता महाले, प्राजक्त तनपुरे.

विधान परिषद उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार - सदस्य अमोल मिटकरी, गोपीचंद पडळकर, रमेश पाटील.

उत्कृष्ट भाषण पुरस्कार - आमशा पाडवी, श्रीकांत भारतीय, सुनील शिंदे यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

# 'डी फार्म' झालेल्या विद्यार्थ्यांना द्यावे लागेल 'DPEE' परीक्षा; नंतरच मिळणार फार्मासिस्ट म्हणून मान्यता

- सर्व परीक्षार्थींना द्यावे लागेल ५९०० रु. परीक्षा फी; गरीब विद्यार्थी कुठून आणणार एव्हढे पैसे
- केंद्र शासनाने काढले राजपत्र; परीक्षा फी पाहून लाखो विद्यार्थी आंदोलनाच्या पवित्र्यात

**नागपूर,:** डी फाम '(Difloma in Pharmac) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना आता डिप्लोमा इन फ्फार्मसी एक्झिट एक्झामिनेशन (DPEE) ही परीक्षा लागू केल्याने लाखो विद्यार्थी आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली आहे.

भारत सरकारने याबाबत राजपत्र काढून विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावीच लागेल असा फतवा काढलेला आहे. या राजपत्राच्या आधारे राष्ट्रीय परीक्षा बोर्ड, न्यू दिल्ली (आयुर्विज्ञान) या संस्थेने अधिसूचना काढून विद्यार्थ्यांना दि. १३ सप्टेंबर पर्यंत परीक्षेसाठी नाव नोंदणी करण्यास कळविले आहे. परंतु या उ्झाएए परीक्षेची परीक्षा फ्फी ही भरमसाठ (५९००/- रु.) असल्याने लाखो विद्यार्थ्यांवर हा अन्याय आहे त्यामुळे विद्यार्थी संघटना आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

देशात कोणत्याही डिप्लोमा कोर्सेससाठी अशी एक्झिट एक्झाम घेतली जात नाही, परंतु डी फ्फार्म या डिप्लोमा कोर्ससाठी फ्फक्त शासनाने ही परीक्षा का आणली याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यात ही विद्यार्थी परीक्षा द्यायला तयार आहेत पण ही भरमसाठ परीक्षा फी पाहून गरीब विद्यार्थी गोंधळून गेलेले आहेत. एकीकडे राज्य शासन लाडकी बहिण योजना राबवून बहिणींना १५०० रु. महिन्याला देत आहे




तर दुसरीकडे केंद्र/राज्य शासन लाडक्या बहिणींच्या मुलांकडून ५९०० रु. परीक्षा फी वसूल करत आहे. ही विसंगती दूर करण्यात यावी अन्यथा राज्यभर विद्यार्थी आंदोलन करणार अशी भूमिका २०२४ ला उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी घेतली आहे. वेळ पडल्यास हे विद्यार्थी उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचेही सांगितले जाते आहे.

# "हिट अँड रन', थरारक घटना सीसीटीव्हीमध्ये कैद

**नागपूर :** संपूर्ण राज्यभरात दिवसेंदिवस ङ्गहिट अँड रनफ्च्या घटना वाढत आहेत. वाहतूक पोलिसांच्या दुर्लक्षामुळे अशा अपघाताच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. अशीच एक घटना गोंदिया शहरातून समोर आली आहे. या घटनेत भरधाव कारचा थरार बघायला मिळाला असून रस्त्याच्या कडेला बसलेल्या दोघांना आणि सायकलस्वाराला या भरधाव कारने चक्क हवेत उडविले आहे. या अपघाताची संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झालेली आहे.गोरेगाववरून गोंदियाकडे येत असताना गोंदियातील पॉलिटेक्निक कॉलेज समोर भरधाव कारने रस्त्याच्या कडेला बसलेल्या दोन ट्रक ड्रायव्हर आणि एक सायकलस्वाराला उडवले आहे. या घटनेत दोन ट्रक ड्रायव्हर आणि सायकलस्वार गंभीर जखमी झाला असल्याची माहिती सम ोर आली आहे. या घटनेमुळे गोंदियात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे वाहतूक पोलिसांचा हलगर्जीपणा उघडकीस आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कारचालक भरधाव वेगाने गोंदिया शहरातील गणेशनगरकडे जात असताना होता. ही कार खोमेश उरकुडे (वय २४ वर्ष रा. कोसेटोला, गोरेगाव) हा चालवत होता. कारचा वेग भयानक होता. कारवरील नियंत्रण सुटल्यामुळे चालक खोमेश गोंधळला. त्याने रस्त्याच्या कडेला बसलेला ट्रकचालक हेमराज राऊत (वय ५४ रा. कारंजा ) आणि कादीर शेख (वय ३८ रा. फ्फुलचूर) आणि एक सायकलस्वाराला जबर धडक दिली.

ही कार इतकी वेगात होती की त्यातील एक व्यक्ति लांबवर हवेत उडाल्याचेही बघायला मिळाले आहे. तीनही जखमींवर गोंदियातील एका खाजगी रूग्णालयात उपचार सुरू आहे.सध्या पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहे अनेक व्हॉट्सअप ग्रूपवर या हिट अँड रनचे सीसीटीव्ही फ्फुटेज प्रसारित होत आहे. अनेकांनी अपघाताचा थरार बघितला आहे.

# जिल्ह्यातील तीन शिक्षकांची सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी निवड

## उत्कृष्ट कार्याची मिळाली पावती, मुंबईत शिक्षक दिनी केले जाणार सम्मानित

**गोंदिया:** समाजाची निस्वार्थ भावनेने आणि निष्ठेने सेवा करणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन देऊन त्यांच्या गुणांचा यथोचित सम्मान करण्यासाठी राज्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार दिला जातो. जिल्ह्यातील तीन शिक्षक सन २०२३-२४ करिता या पुरस्काराचे मानकरी ठरले असून शिक्षक दिनी ५ सप्टेंबर रोजी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना सम्मानित करण्यात येणार आहे.

प्राथमिक, माध्यमिक आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे शिक्षक, शिक्षीका, कला-क्रीडा विशेष शिक्षक अशा सात गटांतून हा पुरस्कार दिला जातो. यातील प्राथमिक शिक्षक गटातून गोरेगाव येथील शहीद जाम्या-तिम्या जिल्हा परिषद विद्यालयात कार्यरत सहायक शिक्षक दिनेश रामदास अंबादे यांना माध्यमिक शिक्षक गटातून आमगाव तालुक्यातील ग्राम भोसा (कालीमाटी) येथील श्री तुकाराम कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत सहायक जशक्षक घनश्याम देवचंद पटले तसेच



संदिप तिडके | दिनेश अंबादे | घनश्याम पटले

आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकासाठी देवरी तालुक्यातील ग्राम सावली येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेतील सहायक जशक्षक संदीप ईश्वरदास तिडके यांची निवड करुन त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# १० कृषि केंद्राचे परवाने निलंबीत

**गोंदिया:** जिल्ह्यात खरीप हंगाम ाच्या पार्श्वभूमीवर बोगस बी-बियाणे, खते व किटकनाशकाच्या विक्रीस आळा घालण्यासाठी कृषि विभागाने ९ भरारी पथक स्थापन केली आहेत. तसेच जिल्ह्यामध्ये २६ गुणनियंत्रण निरीक्षकांचा समावेश आहे. सदर गुणनियंत्रण निरीक्षकामार्फ्फत कृषि केंद्राची अचानक तपासणीसाठी धडक मोहिम जिल्ह्यात राबविली जात आहे.

कृषि केंद्राच्या तपासणीवेळी विक्री परवान्यामध्ये उगम प्रमाणपत्राचा समावेश नसणे, नोंदणी प्रमाणपत्र विहित मुदतीत नुतनीकरण न करणे, शिल्लक साठा व दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, साठा व विक्री रजिस्टर न ठेवणे, रजिस्टरवरील साठा व प्रत्यक्ष साठा न जुळणे, विक्री करत असलेल्या कृषि निविष्ठांचे खरेदी बिल न ठेवणे, ग्राहकास देण्यात येणाऱ्या खरेदी पावतीवर ग्राहकाची सही न घेणे आदी कारणामुळे १० निविष्ठाधारकांचे परवाने निलंबीत करण्यात आ-लेले आहेत. श्री.गणेश कृषि केंद्र पांढराबोडी ता.गोंदिया बियाणे परवाना १ महिन्याकरीता, माँ अंबे कृषि केंद्र दासगाव ता.गोंदिया बियाणे परवाना ६ महिन्याकरीता, किसान क्रांती कृषि सेवा केंद्र बाम्हणी ता.सडक अर्जुनी बियाणे परवाना २ महिन्याकरीता,नागपुरे एग्रो एजंसी गोवारीटोला ता.सालेकसा किटकनाशके परवाना १ महिन्याकरीता, किसान सेवा कृषि केंद्र झालिया ता.सालेकसा किटकनाशके परवाना १ महिन्याकरीता, आरोही कृषि केंद्र नवेझरी ता.तिरोडा किटकनाशके परवाना १ महिन्याकरीता, यशोदा कृषि केंद्र नवेझरी ता.तिरोडा किटकनाशके परवाना २ महिन्याकरीता, गुर्वेश ट्रेडर्स व कृषि सेवा केंद्र धामणगाव ता.आमगाव किटकनाशके परवाना ४ महिन्याकरीता, येरणे कृषि केंद्र ओवारा ता.देवरी खत परवाना ६ महिन्याकरीता, ठाकरे कृषि केंद्र वडद ता.आमगाव खत परवाना २ महिन्याकरीता असे एकूण १० परवाने निलंबीत करण्यात आले आहे.

# 'स्वच्छ माझे अंगण' उपक्रमांत सहभागी व्हा! मुख्य कार्यकारी अधिकारी मुरूगानंथम एम.

## : उत्कृष्ठ व्यवस्थापन करणाऱ्या कुटूंबाचा होणार सत्कार

**गोंदिया:** कौटूंबिकस्तरावर नित्यनेम ाने स्वच्छतेचा अंगीकार करून स्वच्छतेची लोकचळवळ निर्माण करण्यासाठी संपूर्ण जिल्हयात राज्यशासनाच्या आदेशान्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग आणि ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छ माझे अंगण' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांत जिल्हयातील सर्वच कुटूंबियांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषद गोंदियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी . मुरूगानंथम एम. यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत जिल्हयातील सर्वच गावे हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करावयाची आहेत. त्या अनुषंगाने ग्रामीण भागातील कुटूंबियांसाठी राज्यशासनाच्या निर्देशान्वये जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत एक सप्टेंबर ते २५ सप्टेंबर दरम्यान हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

कुटूंबस्तरावर वैयक्तीक स्वच्छता पाळणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक कुटुंबाकडे वैयक्तीक शौचालय असावे. त्याचा नियमित वापर असावा. यासोबतच प्रत्येक कुटूंबाकडे सांडपाणी व्यवस्थापनाकरीता शोषखड्डा, परसबाग अथवा पाझरखड्डा अस-ावा. घनकचरा व्यवस्थापनाकरीता कंपोस्ट खतखड्डा, अथवा घरगुती खत खड्डा आणि कुटूंबस्तरावर कचराकुंडयांची उपलब्धता असायला हवी. कुटूंबस्तरावर दैनंदिन घनकचऱ्याचे ओला आणि सुका असे वर्गीकरण करणे आवश्यक आहे. दरम्यान घरगुती खतखड्डा अथवा परसबाग, वैयक्तीक शोषखड्डा अथवा पाझरखड्डा, वैयक्तीक शौचालय आणि घरगुती कचराकुंडया असलेल्या तथा त्यांचा सुयोग्य वापर करणाऱ्या कुटूंबाची ग्रामपंचायतस्तरावर ग्रामपंचायत कार्यालयातील पाणी व स्वच्छता समिती मार्फ्फत २६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर दरम्यान पडताळणी करण्यात येणार असल्याची माहिती पाणीव स्वच्छता विभागाचे उपम ुख्य कार्यकारी अधिकारी आनंदराव पिंगळे यांनी दिली.

निकषाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर निवड केलेल्या कुटूंबाची यादी प्रसिध्द करून त्यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी २ ऑक्टोबर रोजी आयोजित ग्राम सभेत प्रशस्तीपत्र देवून गौरविण्याचे निर्देश ग्रामपंचायतींना देण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

### गावांत दवंडी द्या

अभियानाचा कालावधी हा १ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर असा आहे. २६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर दरम्यान कुटूंबाची पडताळणी करण्यात येणार आहे. त्यानंतर पात्र कुटूंबाची यादी ग्रामपंचायत कार्यालयात प्रसिध्द करण्यात येईल.

दरम्यान १ ऑक्टोबर रोजी पात्र कुटुंबाना लेखी निमंत्रण देवून २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत त्यांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात येणार आहे. उपक्रमांच्या माहितीसाठी गावांत दवंडी द्यावी, तथा ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, सोसायटी कार्यालय, तलाठी सज्जा याठीकाणात उपक्रमांची सूचना सूचना फलकावर लावण्यात यावी.


साप्ताहिक व न्यूज पोर्टल,ई-पेपर

बेरार टाईम्स

**जिल्हा व तालुका प्रतिनिधी पाहिजेत**

सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कार्याची दखल घेणारे प्रसिद्ध साप्ताहिक व पोर्टल बेरार टाईम्स वृत्तपत्रा करीता जाहिरात व्यवसाय व पत्रकारितेची आवड असणाऱ्यांना सुवर्ण संधी.

सामाजिक, राजकीय क्षेत्रात सक्रिय कार्याची दखल घेण्यासाठी तसेच जन सामान्याच्या न्याय हक्काचा, जन आंदोलचा आवाज बुलंद करण्यासाठी इत्यादी विषयांवर लिखाण करण्यास इच्छुक असणाऱ्यांना, महाराष्ट्रातील सर्वच **जिल्हा प्रतिनिधी, गोंदिया व भंडारा जिल्ह्यात सर्व तालुक्यात प्रतिनिधी, जिल्हा परिषद क्षेत्रनिहाय मानसेवी स्वतंत्र पत्रकार प्रतिनिधी नियुक्त करायचे आहे.**

तरी इच्छुक व्यक्ती, युवक-युवतींनी आपला बायोडाटा खालील ई-मेल berartimes@gmail.com यावर तसेच खालील कार्यालय पत्यावर ७ सप्टेंबर पर्यंत पाठवावे.

**पात्रता:-**

- उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.संगणक टायपींगचा अनुभव असावा.
- मराठी, हिंदी भाषेवर प्रभुत्व, तसेच भाषांतर कौशल्य असावे. स्वतंत्र लेखन, विविध घटना/घडामोडींचे विश्लेषण करण्याची क्षमता असावी.
- जाहिरात संकलन व बातमीदाराच्या कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार केला जाईल.

**टीप:-** निवड झालेल्या प्रतिनिधीचे काम बघून ओळखपत्र दिले जाईल.

कार्यालयाचा पत्ता:-डोलारे एजेन्सी समोरील रस्ता, शिव नगर, मनोहरभाई पटेल, वार्ड नं.४, गोंदिया ४४१६१४ (महा.)
मो.9423112431,8080815329
Email:berartimes@gmail.com, berartimes11@gmail.com
berartimes.com | Berar Times
@berartimes | Berar Times

## संपादकीय

# छत्रपतींच्या पुतळा कोसळलाच कसा

गेल्या वर्षी ४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनाच्या निमित्ताने राजकोट किल्ल्यावर छत्रपती महाराजांचा पुतळा उभारण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण केले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन केंद्रीयमंत्री नारायण राणे अशा दिग्गजांच्या उपस्थितीत हा शानदार सोहळा संपन्न झाला. पण आठ महिन्यांत ३५ फूट उंचीचा हा पुतळा कोसळला. महाराष्ट्रात यापूर्वी असे कधी घडले नव्हते.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत, महाराष्ट्राची अस्मिता आहेत, मराठी माणसाच्या मनात आणि रोमारोमांत छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा, त्यांचे विचार आणि आचार भिनलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज की जय आणि जय भवानी – जय शिवाजी या घोषणा म्हणजे मराठी माणसांचा ऊर्जा स्त्रोत आहेत, अशा महापुरुषाचा पुतळा कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणला राजकोट किल्ल्यावर कोसळून पडतो या घटनेने तमाम मराठी माणसाला वेदना झाल्या आहेत. पण या घटनेला जबाबदार कोण, दोषी कोण याचा वेगाने शोध घेण्याऐवजी राज्यातील राजकीय पक्ष व त्यांचे नेते एकमेकांवर सुसाट चिखलफेक करीत सुटले आहेत.

महाराजांचा पुतळा कोसळल्यावर संपूर्ण राज्यात जनतेला संताप आला. जे दोषी आहेत, त्यांना भर चौकात चाबकाने फोडले पाहिजे अशी प्रतिक्रिया प्रकट झाली. पण जनतेने मनावर संयम राखला. कुठेही संताप व्यक्त करण्यासाठी तोडफोड झाली नाही. हिंसाचार झाला नाही. पोलिसांना कुठेही बळाचा वापर करावा लागला नाही. पण राजकीय पक्षांच्या नेत्यांनी मात्र ताळतंत्र सोडल्यासारखे वर्तन केले. आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले. शिल्पकार म्हणून जयदीप आपटे व स्ट्रक्चरल कन्सल्टंट म्हणून चेतन पाटील यांची निवड कोणी व कशाच्या आधारावर केली? शिल्पकाराचा अनुभव काय? पस्तीस वर्षांच्या तरुणाला एवढे मोठे काम कसे दिले गेले? मालवणला महाराजांचा पुतळा उभारण्याच्या कामात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाला, असेही महायुती सरकारवर विरोधकांनी आरोप केले. विरोधी पक्षाने थेट सार्वजनिक बांधकाम खात्यावर खापर फ्फोडले व मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या राजीनाम्याची मागणी केली. महाराजांचा पुतळा शासनाने नव्हे तर नौदलाने बसवला असे स्वत: मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यामुळे या दुर्घटनेला नेमके कोण दोषी आहेत याचे गूढ वाढले. ताशी ४५ किमी वेगाने वारे वाहत असताना हा पुतळा कोसळून पडला अशी माहिती राज्य सरकारने दिली पण त्यावर विश्वास कसा ठेवायचा?

राज्यात शाळेत जाणाऱ्या मुलीही सुरक्षित नाहीत आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांचेही महायुती सरकारला संरक्षण करता येत नाही, अशी आगपाखड विरोधी पक्षांनी केली. महाराजांनी उभे केलेले गडकिल्ले साडेतीनशे वर्षे भक्कमपणे उभे आहेत. त्यांचीही देखभाल उत्तम प्रकारे सरकार करीत नाही. विशाल गडावर अतिक्रमणांचा विळखा पडल्यावर आंदोलन झाले तेव्हा सरकारला जाग आली. राजकारणी नेते ऊठ सूठ छत्रपतींचे नाव घेतात मग त्यांचे पुतळे व गड किल्ल्यांची देखभाल उत्तम का ठेऊ शकत नाहीत? मालवणच्या पुतळ्याचे खापर नौदलावर फोडले गेले, खरोखरंच आपले नौदल इतके लेचेपेचे आहे का? लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर घाईघाईने पुतळा उभारला गेला व शिल्पकाराला पुतळा लवकर देण्याची घाई करण्यात आली हे खरे का?

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यापासून महायुतीचे सरकार बचावात्मक आहे. दोषींवर कारवाई करू किंवा नवीन पुतळा लवकरच उभारू असे सरकार सांगत आहे. गुन्हेगार कोण आहेत, दोषी कोण आहेत, हे जनतेपुढे आलेले नाही. महाराजांचा पुतळा कोसळला याला जबाबदार कोण, याचे उत्तर सरकार देत नाही. म्हणून लोकांमध्ये संभ्रम आहे.

गेल्या वर्षी सनातन प्रभातमध्ये जयदीप आपटे यांची मुलाखत प्रसिद्ध झाली आहे, त्यात ते म्हणतात, मला वाटतं की, संधी मोठी आहे, मनात विचार आला की, सगळं नीट पार पडलं तर आपलं नाव होईल. पण एक जरी चूक झाली तर सगळं संपेल:

नवी दिल्लीच्या नवीन महाराष्ट्र सदनात छत्रपती शिवाजी महाराज, म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे महाराष्ट्राचा अभिमान वाटावा, अशा दिमाखाने विकासक चमणकर बंधूंनी परिश्रमपूर्वक उभे केले आहेत. प्रताप गडावर महाराजांचा भव्य पुतळा उभा आहे. पंडित जवाहर नेहरूंनी त्याचे अनावरण केले होते. त्या घटनेला ६७ वर्षे झाली.

मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया समोर शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा गेली ६३ वर्षे दिमाखात उभा आहे, तेव्हा फार मोठे इव्हेंट साजरे केले गेले नव्हते. गेट वे ऑफ इंडियावरही समुद्रावरून वेगवान वारे आदळत असतात, मग मालवणलाच का दुर्घटना घडावी? मालवणचा पुतळा खाऱ्या वाऱ्यामुळे कोसळला की मतलबी वाऱ्यामुळे? मालवणचा पुतळा उभारताना निष्काळजीपणा झाला, सर्व महाराष्ट्राची मान खाली गेली.

# चितळाची शिकार करणाऱ्या चार आरोपींना रंगेहात अटक



**अर्जुनी मोरगांव:-** तालुक्यातील राजीवनगर येथे दि.१ सप्टेंबर ला राजीवनगर येथील विशाल प्रभु शहारे यांचे राहते घरी वन्यप्राणी चितळाचे मास असल्याची गुप्त माहिती मिळताच अर्जुनी/मोर वनक्षेत्र क्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन कटरे यांनी आपल्या ताफ्यासह मौकास्थळी धाड टाकून विशाल प्रभु शहारे राजीवनगर यांचे राहते घरातून वन्यप्राणी चितळाचे ४.५ कि.ग्रॅम मास हस्तगत केले.

### आता पर्यंत एकुण चार आरोपी ताब्यात

अधिक तपास केले असता त्यांच्या कडून शिकार करण्याकरिता उपयोगात येणारे दोन नग लोखंडी सळई, दहा नग लोखंडी फ्फासे असे अवजारे त्यांच्या कडून मिळाले आहे. विशाल प्रभु शहारे यांच्या कडून मिळालेल्या माहितीनुसार त्याने मौजा बरडटोली (अर्जुनी/मोर) येथे असलेला त्याचा सोबती बलदेवसिंग धर्मेंद्रसिंग टाक, भोजराम बावणे व फ्फरार आरोपी दुर्गेश बावणे यांच्या सोबत एकमत करुन वन्यप्राणी चितळ व रानडुक्कराची शिकार केली असल्याचे लक्षात आले. तेव्हा मौजा बरडटोली (अर्जुनी/मोर) येथे वास्तव्यास असलेल्या बलदेवसिंग टाक यांचे राहते घराची झडती घेतले असता वन्यप्राणी चितळाचे शिजविण्यात आलेली मास व वन्यप्राणी रानडुक्कराचे कच्चे मास त्याचे कडून मिळाले. शिवाय शिकारी करिता वापरण्यात आलेले दोन नग भरमार बंदुक जप्त करण्यात आले. वन्यप्राणी रानडुक्कर व चितळ यांच्या शिकार प्रकरणी वनगुन्हा क्र. ०४६०६/०२/२०२४ दि.१ सप्टेंबर २०२४ अन्वये जारी करण्यात आला असून आता पर्यंत एकुण चार आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

तसेच पुढील तपासात आणखी आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. सदर प्रकरणी संपुर्ण कार्यवाही ही गोंदिया उपवनसंरक्षक प्रमोद पंचभाई व नवेगांवबांधचे प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी अविनास मेश्राम यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

पुढील तपास सचिन कटरे वनपरिक्षेत्र अधिकारी वनक्षेत्र अर्जुनी/मोर हे करीत आहेत. आणि या चारही आरोपींना आज कोर्टामध्ये हजर करणार असल्याची माहिती आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# महाराज,आम्हाला माफ करा!आम्ही नालायक आहोत!

वंदनीय महाराज,

आज तुमच्याशी बोलतानाही अंगाचा थरकाप उडतो आहे. तुमच्याशी संवाद साधण्याची सुध्दा हिंमत होत नाही. कारण तुमच्याशी बोलण्याच्या आणि तुमचे नाव घेण्याच्या सुद्धा आम्ही लायकीचे नसून आम्ही नालायक आहोत हे आता सिद्ध झालेले आहे.तुम्ही बांधलेले गड किल्ले शेकडो वर्षापासून अतिशय चांगल्या स्थितीत असताना,स्वतःला २१ व्या शतकातील विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे हुशार आणि विद्वान समजणारे आम्ही साधा तुमचा मजबूत पुतळा सुद्धा उभा करू शकत नाही यावरून आमची लायकी काय आहे हे तुमच्या लक्षात आले असेलच ! तुमच्या नावाचा केवळ जयजयकार करायचा, निवडणुकीमध्ये तुमच्या नावावर मते मागायची, तुमचे नाव घेऊन लोकांना खोटी आश्वासने द्यायची एवढ्या पुरतेच तुम्हाला आम्ही मर्यादित केलेले आहे आणि दर पाच वर्षांनी आमचा हाच खोटा धंदा सुरू आहे. तुमचा पुतळा कोसळला याचे दुःख आणि वेदना तर शब्दात वर्णन केल्या जाऊ शकत नाही,पण आमची नीतिमत्ता ढासळली हे मात्र शंभर टक्के सत्य आहे.

वं.महाराज, तुमच्या पुतळ्यातही भ्रष्टाचार होऊ शकतो आणि हा भ्रष्टाचार करताना आम्हाला जराही लाज, लज्जा, शरम, भीती वाटत नाही. याचाच अर्थ आम्हाला तुमच्या सन्मानाचा, कर्तुत्वाचा, शौर्याचा आणि त्यागाचा जराही अभिमान आणि आदर नाही हेच दिसून येते. तुमचा पुतळा आठ महिन्यात कोसळला म्हणून तुम्ही आमच्यावर जराही रागावणार नाही हे सुद्धा आम्हाला माहित आहे कारण तुम्हाला सुद्धा आता आमच्या नालायकीची, हरामखोरीची आणि विकृतीची पूर्णता जाणीव झालेली आहे. दहा वर्षापासून अरबी समुद्रात तुमचे स्मारक उभे करू म्हणणारे आणि स्मारकाची एकही वीट उभी न करता कोट्यावधी रुपये हडप करणारे भ्रष्टाचारी आणि नालायक लोक ज्या देशात राहतात तो देश कधीच महासत्ता होऊ शकत नाही याची जाणीव तुम्हाला सुद्धा झाली असेलच महाराज !

स्वतःला मिरवून घेण्यासाठी, स्वतःच्या हाताने स्वतःची पाठ थोपटून प्रसिद्धी मिळवण्यासाठी आमचा हा सगळा नालायकपणा सुरू आहे. स्वतःच्या प्रसिद्धीच्या नादात आमच्या श्रद्धास्थानांचा जाहीर अपमान झाला तरीसुद्धा त्याच्याशी आम्हाला काहीही घेणे देणे नाही. या देशाचा मानबिंदू असलेल्या सर्वोच्च संसदेला एका वर्षात गळती लागते, समस्त हिंदू बांधवांचे आराध्य दैवत असलेल्या राम मंदिराचीही एका वर्षात तशीच वाईट अवस्था होते, आमच्या महाकाल मंदिरालाही त्याच अवस्थेला सामोरे जावे लागते, नवीन विमानतळांची पडझड होते, वर्षभरात आमचे कित्येक पूल पडतात, रस्ते वाहून जातात आणि तरीही आम्ही महासत्ता झाल्याचा डांगोरा पिटतो. आम्हाला याची जराही शरम वाटत नाही.

पूजनीय महाराज, तुम्ही आता पुन्हा या देशात जन्म जरी घेतला तरी सुद्धा आम्ही जराही सुधारणार नाही इतके आम्ही षंड आणि निर्लज्ज झालेले आहोत. तुमच्या नावावरून धर्माचे राजकारण या देशात केले जाते. परंतु आजपर्यंत कोण्या दुस?्या धर्माच्या माणसांनी तुमचा अपमान केल्याचे, तुमच्याविषयी वाईट लिहिल्या-बोलल्याचे आठवत नाही. पण आम्ही मात्र वेळोवेळी सातत्याने तुमचा अपमान करीतच आलेलो आहे आणि अपमान करणाऱ्याचे समर्थन सुद्धा करीत आलेलो आहे. इतके बदमाश, विकृत आणि स्वार्थांध असलेले आम्ही लोक आहोत. परदेशी लेखकांना तुमच्याविषयी चुकीची, खोटी आणि घाणेरडी माहिती पुरवून तुमचा आणि तुमच्या मातोश्रींचा अपमान आणि चारित्र्यहनन करणारे महाभाग सुद्धा आमच्याच महाराष्ट्रात आहे. यावरून आम्ही खरोखर तुम्हाला पूजनीय, वंदनीय मानतो का याचा विचार तुम्हीच करावा !

पूज्य महाराज, तुमचा पुतळा हा फक्त दगड, सिमेंट, विटांचा पुतळा नसून या महाराष्ट्राची, देशाची अस्मिता आहे.तुमच्या नावाने या देशातल्या तरुणांचं रक्त सळसळते.तुमच्या नावाचा जयघोष करून या देशाचे सैनिक शत्रूवर तुटून पडतात आणि शत्रूला नामोहरम करतात.तुमचे नाव हा आता एक पवित्र मंत्र झालेला आहे. परंतु या देशातल्या काही लोकांना अजूनही तुमच्याविषयी प्रेम, आपुलकी,जिव्हाळा वाटत नाही याचे खूप दुःख वाटते महाराज ! स्वतःच्या स्वार्थासाठी तुमचा वापर करायचा आणि विचार मात्र तुमच्या शत्रूंचे अमलात आणायचे ही अतिशय घृणास्पद नीती आमच्या देशात सुरू आहे. त्यामुळेच तुमचा पुतळा कोसळला महाराज ! हा पुतळा कोसळला की तो कोसळला पाहिजे अशा पद्धतीनेच बांधला यावरही आता संशोधन होणे गरजेचे आहे. कारण विज्ञान आणि तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या या युगात आठ महिन्यात एखादा पुतळा कोसळून पडल्याचे उदाहरण आम्हाला तरी आठवत नाही. त्यामुळे यामध्ये निश्चितच तुमचा अवमान करण्याचे फ्फार मोठे कारस्थान आहे असे आम्हाला वाटते.महाराज, आम्हाला माफ्फ करा ! आम्ही तुमचा सन्मान करू शकलो नाही कारण आम्ही नालायक आहोत. परंतु तुमच्या विचारांवर हृदयापासून प्रेम करणारे जे जे लोक असतील ते निश्चितच तुमच्या या अपमानाचा बदला घेतील एवढे मात्र नक्की महाराज !

# समाजातील रत्न शोधून त्यांचा गौरव हे दिशा देणारे कार्य : आ.अग्रवाल

## प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाचा स्थापना दिन व सत्कार सोहळा



**गोंदिया:** समाजात सकारात्मक बदल घडविण्याकरिता, सेवा रूपाने अनेक महानुभाव व्यक्ती कुठलीही अपेक्षा न ठेवता त्यांच्या क्षेत्रात कठीण साधनेतून चमत्कारिक कामे करीत असतात. ते प्रसिद्धीच्या झोतात ही नसतात. परंतु अशा लोकांना शोधून काढणे, त्यांच्याद्वारे केलेले कार्य समाजासमोर आणणे व अशा बहुमूल्य रत्नाचा गौरव करणे हे खरोखर दिशा देणारे आहे. यामुळे त्यांना प्रोत्साहन व समाजाला प्रेरणा मिळत असल्याचे प्रतिपादन आमदार विनोद अग्रवाल यांनी केले. ते प्रेस ट्रस्ट ऑफ्फ गोंदियाच्या ९ व्या स्थापना दिनानिमित १ सप्टेंबर रोजी हॉटेल जिंजर येथे आयोजित सत्कार सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.

प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाचे अध्यक्ष अपूर्व मेठी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमात प्रामुख्याने जि प अध्यक्ष पंकज रहांगडाले, आ. मनोहर चंद्रिकापुरे, माजी मंत्री राजकुमार बडोले, माजी आ. राजेंद्र जैन, अदानी पॉवरचे प्रकल्प प्रमुख मयंक दोषी, सचिव रवी आर्य आदी उपस्थित होते.

आ. चंद्रिकापुरे म्हणाले की वर्तमानपत्र हे समाजाला आरसा दाखविण्याचे काम करते. त्यांनी त्यांचे काम असेच करीत रहावे. या प्रसंगी माजी आमदार राजेंद्र जैन म्हणाले की, पत्रकार हे निष्पक्षपणे घडलेल्या घटना समाजासमोर आणतात. अनेक समस्या शासन व प्रशासनासमोर आणून न्याय मिळवून देण्याचे काम ते करतात.जि प अध्यक्ष रहांगडाले म्हणाले की, राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्य करीत असताना पत्रकारांचे अनेक अनुभव येतात, विविधांगी दर्शन होत असतात. आजकाल तर या क्षेत्रात डिजिटलमुळे मोठी वाढ झालेली आहे. परंतु प्रशिक्षण प्रत्येक क्षेत्रात आवश्यक असल्याचे ते बोलले. दोन सत्कारमूर्ती माझ्या जिल्हा परिषदेचे असल्याने मला त्यांचा अभिमान असल्याचे ते म्हणाले. माजी मंत्री बडोले यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आज ग्लोबल इंडेक्स मध्ये आपल्या देशाची मिडिया व पत्रकारिता कुठे आहे यावर चिंतन करणे गरजेचे आहे. लोकशाही मध्ये माध्यमांना मोठे महत्व आहे. माध्यमांनी आपली भूमिका चोखपणे पार पाडावी कारण जनतेची मोठी अपेक्षा त्यांच्यावर आहे. अदानी पॉवर तिरोडाचे प्रकल्प प्रमुख मयंक दोषी यांनी अपल्या संबोधनातून पूर्वी व आजघडीला देशात होत असलेल्या वीजनिर्मिती बद्दल तुलनात्मक विकासावर विस्तृत माहिती दिली.आपल्या अध्यक्षीय भाषणात अपूर्व मेठी यांनी मागील नऊ वर्षात संस्थेच्या प्रगतीचा आढावा ठेऊन पत्रकारिता क्षेत्रात कार्य करणाऱ्या समोरची आव्हाने, त्यांचा संघर्ष व उद्देशावर सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव रवि आर्य यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन उपाध्यक्ष जयंत शुक्ला यांनी केले. सत्कारमुर्तींचे परिचय वाचन जावेद खान यांनी तर आभार राजन चौबे यांनी मानले.

प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाच्या वतीने वरिष्ठ पत्रकार संतोष पांडे यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे स्व.रणजीत भाई जसानी स्मृति जिल्हा गौरव सामाजिक सेवा पुरस्कार नरेश लालवानी यांचा, स्व.रामकिशोर कटकवार स्मृति जिल्हा गौरव कर्त्तव्यनिष्ठ पुरुस्कार श्रीमती अर्चना वानखेड़े यांना प्रदान करण्यात आला, स्व.रामदेव जायसवाल स्मृति गौरव साहित्य रत्न पुरस्कार ॲड.लखनसिंह कटरे यांना सपत्नीक देण्यात आला, स्व.मोहनलाल चांडक स्मृति जिल्हा गौरव कृषिरत्न पुरस्कार उरकुडाभाऊ पारधी यांना, सहयोग संस्थेद्वारा शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हा गौरव पुरस्कार नरेन्द्र अमृतकर यांचा सपत्नीक सत्कार, स्व.योगेश नासरे स्मृति जिल्हा विशेष पुरस्कार अशोक मेश्राम व मटका कोला सेवा समिती गोंदिया यांना विशेष पुरस्कार देवून मान्यवरांच्या हस्ते शॉल, श्रीफळ, गौरवचिन्ह, सन्मानपत्र व पुरस्कार राशी देवून सत्कार करण्यात आले. मटका कोला सेवा समितीतफ र्फे लक्ष्मीचंद रोचवानी, सतिश रोचवानी, माधवदास खटवानी, सुशिल संतानी, राजकुमार आसवानी यांनी पुरस्कर स्विकारले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपाध्यक्ष संतोष शर्मा, कोषाध्यक्ष हिदायत शेख, कार्यकारिणी सदस्य हरिन्द्र मेठी, आशीष वर्मा, अंकुश गुंडावार, कपिल केकत, नरेश रहिले, रविन्द्र तुरकर, संजीव बापट, भरत घासले, प्रमोद नागनाथे, मुकेश शर्मा, दीपक जोशी, राहुल जोशी, योगेश राऊत, सौ.अर्चना गिरी, बिरला गणवीर यांनी सहकार्य केले.

# “भ्रष्टाचारी महायुती सरकारला घेऊन जा गे मारबत:”




**गोंदिया :** भ्रष्टाचारी महायुती सरकारला घेऊन जा..गे.. मारबतः. महाराजांचा अनादर करणा?्या सरकारला घेऊन जा..गे.. मारबत. बदलापूर, आकोलातील चिमुकल्या विद्यार्थिनीची रक्षा न करू शकणाऱ्या खोके सरकारला घेऊन जा.. गे.. मारबत.. अश्या आगळ्या वेगळ्या राजकीय घोषणा देत मंगळवार ०३ सप्टेंबर रोजी गोंदिया जिल्हा काँग्रेस, युवक काँग्रेस तसेच एन.एस. यू.आय.च्या कार्यकर्त्यांनी मारबतच्या दिवशी गोंदिया जिल्हा काँग्रेस सरचिटणीस निलम हलमारे मित्र परिवाराने गोंदिया शहरातील सिविल लाइन, मामा चौक, शास्त्रीवॉर्ड, गांधी वार्ड येथे मारबत ची मिरवणूक काढली व विश्रांती करिता मारबत थांबत असलेल्या प्रत्येक चौकात महाराजांचा अनादर करणाऱ्या सरकारला घेऊन जा.. गे.. मारबत व बदलापूर घटनेवर गप्प असलेल्या सरकारला घेऊन जा.. गे:मारबत काँग्रेस कार्यकर्त्यांकडून अश्या घोषणा देण्यात येत होते.

गोंदिया जिल्हा युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी बदलापूर दोषींवर कारवाई व्हावी या उद्देशाने ही मारबत काढून भाजपा आणि राज्यातील महायुती सरकारचा निषेध केला. बदलापूर आणि अकोला येथील विद्यार्थिनी वर झालेल्या लैंगिक अत्याचार आणि मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा विषय उपलब्ध करून राज्य सरकार विरोधी घोषणा देण्यात आल्या.या प्रसंगी गोंदिया जिल्हा काँग्रेस सरचिटणीस निलम हलमारे, जिला सचिव विजेंद्र बरोंडे, जिल्हा उपाध्यक्ष विक्की गोहरे, एन. एस. यू. आय. चे जिल्हा उपाध्यक्ष राहुल बावनथडे, शहर अध्यक्ष कृष्णा बिभार, शिवम कारोसिया, अभिजीत रघुवंशी, अक्षय गद्दालवार, गौरव बरोंडे, नरेश मोगरे, विवेन फ्रांसेस, रवि परिवार, गोपाल गराडे व इतर कार्यकर्ता उपस्थित होते.

# कॉलेजियम प्रणाली!

बाबासाहेबांचे पूढील वाक्य सतत कार्यरत ठेवते. मआपण आपल्या भवितव्याविषयी नेहमी जागे असले पाहिजे.

भवितव्याविषयी जागे असतांना ते प्रभावित करणाऱ्या घटकांची किमान जाण असणे आवश्यक ठरावे. त्या अनेकात एक 'कॉलेजियम प्रणाली' (Collegium system) ही आहे. ती नक्की काय असेल? देशाला, जीवनाला, पिढ्यांना प्रभावित करणारी ही राखणदार माणसं कशी नियुक्त होत असतील ? उत्सुकता असते. राष्ट्रपती, प्रधानमंत्री कसे नियुक्त होतात ते कळते. हे कळत नाही. कदाचित ती गरज असेल.

अधिकृत भाष्य करता येणार नाही. पण प्राथमिक माहिती अशी की कॉलेजियम प्रणाली कार्यपालिकेच्या अधीन नाही. ती स्वतंत्र व स्वायत्त आहे.संविधानात या प्रणालीची नोंद नाही. १९९३ पासून या प्रणालीचा (System) चा प्रारंभ झाला. या कॉलेजियममध्ये सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश व सोबतचे चार वरिष्ठ न्यायाधीश असतात.

कॉलेजियम प्रणाली या प्रक्रियेला उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कोणाला नेमावे हे ठरविता येते. उच्च न्यायालयातील स्थानांतरणाचेही अधिकार या प्रणालीकडे असतात.

सरकार या ठरविण्याला मान्यता देत असते.असे सांगतात, कॉलेजियम प्रणाली येण्याला सर्वोच्च न्यायालयाचे तीन निकाल कारणीभूत असल्याचे सांगतात. ज्याला मन्यायाधीशांचा निकालफ असे म्हटले जाते.



आपल्या दृष्टीने महत्त्वाचे म्हणजे देशबदलाच्या आवर्तात कॉलेजियम प्रणाली चे स्थान काय असावे. आधी बदल या शब्दाचा अर्थ जुन्याकडून नव्याकडे असा व्हायचा. आता अर्थ नव्याकडून जुन्याकडे असा केला जातो. मधल्या काळात नव्या उपराष्ट्रपतींनी आपल्या पहिल्या भाषणात कॉलेजियम प्रणाली विरुद्ध भरपूर ताशेरे ओढले होते. त्यांना न्यायपालिका सरकारच्या पूर्ण अधीन हवी. अधूनमधून अशी विरुध्दता व्यक्त होत असते.सध्या, आरक्षण तरतुदीवरुन ही मकॉलेजियम प्रणालीफ देशभर चर्चेत आहे? आरक्षण तरतुदीत उपवर्गीकरण व क्रिमिलेयर ही जोड सूचविल्याने ही चर्चा उदभवली.

या मुद्द्यावरुन देशात वैचारिक विभागणी झालीय. विभागणीचा रोख आता उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात ओबीसी, एस सी, एस टी, अल्पसंख्याक यांचे उचित प्रतिनिधित्व का नाही? गुणवत्ता व उपलबधता दोन्ही असतांना! देश लोकांचा आहे. आवाज उठेलच!

विशेष म्हणजे आरक्षण संज्ञेचा सुतोवाच म फ्फुले यांनी केला. त्या संज्ञेला पहिल्यांदा रुजू शाहू महाराज यांनी केले. नंतर संविधानात्मकता बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली. हे तिन्ही महान आजच्या या महाराष्ट्रातील आहेत.

.. आणि या आरक्षण संज्ञेला जोरदार धक्का देणारे प्रमुख सरन्यायाधीश व प्रमुख न्यायाधीश हे दोन्ही मान्यवर याच महाराष्ट्रातील आहेत. हीही चर्चा असते.

अर्थात, न्यायपालिकेचा पूर्ण आदर बाळगून 'कॉलेजियम प्रणाली' हा विषय आता लिहायचा व बोलायचा झाला आहे.? कदाचित तो राजकारणाचाही होईल. जो विषय लोकचर्चेचा नव्हता तो होईल असे संकेत दिसतात !

**रणजित मेश्राम**

# ग्रंथालयाच्या इतिहासातील पाटील दांपत्याचा आगळा-वेगळा प्रयोग

## शिक्षक दिनाच्या निमित्ताने विशेष लेख

धरणगुत्ती येथील सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. सुनील दादा पाटील आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. संजीवनी सुनील पाटील या शिक्षक दांपत्याने आपला मुलगा चिरंजीव प्रिन्स सुनील पाटील याच्या सहयोगाने मागील अनेक वर्षांपासून आपल्या परिसरात जास्तीत जास्त मुलांनी वाचलं पाहिजे या उदात्त हेतूने एक सामाजिक दायित्व या भावनेने निरपेक्षपणे कार्य करीत आहेत. लेखकाची संवेदनशीलता समाजाचे प्रश्न मांडते आणि ते सोडवण्यासाठीसुद्धा पुढाकार घेते हे पाटील परिवाराने आपल्या प्रत्यक्ष कृतीमधून दाखवून दिले आहे.

ग्रामीण भागातील, खाजगी शाळा, जिल्हा परिषद आणि नगर परिषदांच्या सुमारे पंचवीस पेक्षा अधिक शाळांना मोठ्या प्रमाणात ग्रंथ देणगी स्वरुपात देऊन त्या - त्या शाळांच्या माध्यमातून लहान - लहान ग्रंथालयांची निर्मिती केली आहे. प्रत्येक शनिवारी मुले या ग्रंथालयातील आपल्या आवडीची पुस्तके घरी घेऊन जातात. एकदा निवडलेले पुस्तक सदर विद्यार्थ्याकडे आठ दिवस राहते. या आठवड्याच्या कालावधीत सदर विद्यार्थ्याचे आई-वडील, आजी- आजोबा, बहीण-भाऊ, आणि मित्र-मैत्रिणी याच्या विना शुल्क लाभ घेत आहेत. आज मितीला त्यांच्या या संकल्पनेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्या वाचनाकडे वळले असून. नियमित पुस्तक वाचनाच्या सवयीमुळे विद्यार्थी मोबाईल आणि टेलीव्हिजन पासून दूर जात आहेत हा एक खूपच चांगला दृश्य स्वरुपातील बदल पहावयास मिळत आहे. एकंदरीत विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागल्यामुळे नियमित अभ्यास करणे आणि नियमितपणे शाळेला येण्याचे मुलांचे प्रमाण वाढले आहे.

डॉ. सुनील दादा पाटील आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. संजीवनी सुनील पाटील या शिक्षक दांपत्याचा मुलगा चिरंजीव प्रिन्स सुनील पाटील हा संपूर्ण परिवाराचे ग्रंथप्रेम सर्वश्रुत आहेतच शिवाय ते सर्वजण उत्तम वाचक आहेत. पन्नास हजार पेक्षा अधिक विविध विषयांवरील आणि विविध भाषेतील पुस्तकांचा त्यांचा स्वत:चा मोठा ग्रंथसंग्रह आहे. आपल्या स्व: मालकीच्या ग्रंथसंग्रहातील आणि समजतील अन्य दानशूर व्यक्तींनी त्यांना देणगी स्वरुपात दिलेल्या पुस्तकांच्या माध्यमातून ते शाळा-शाळांना मोठ्या प्रमाणात ग्रंथदान करत आहेत.

डॉ. सुनील दादा पाटील हे एक उत्तम लेखक असून खंगत अभावग्रस्त जगणारा गावगाड्यातला अखेरचा माणूस त्यांच्या साहित्याचा विषय राहिला आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण नगर परिषद आणि जिल्हा परिषदेच्या शाळेत झाल्याने गाव गाड्यातला सूक्ष्म भवताल त्यांच्या बालमनावर उमटलेला दिसतो. सर्वसाधारण खेड्यातल्या पोरासारखंच त्यांचंही कुरतडून टाकणारं बालपण त्यांच्या कवितेतून वेळोवेळी प्रवर्तित आलेलं दिसतं. असंख्य खेड्यातून आलेल्या नवोदित लेखकांच्या हाताला लिहितं करणारा, बळ देणारा एक तरुण आणि कल्पक प्रकाशक म्हणूनसुद्धा ते साहित्य क्षेत्रात परिचित आहेत. हल्ली काही प्रस्थापित साहित्यिक आपल्याच कोशात जगताना दिसून येतात. मात्र अशा काळात त्यांना भेटलेली, भावलेली वेगवेगळ्या क्षेत्रातली माणसे कवितेच्या मध्यवर्ती ठिकाणी आणली आहेत. डॉ. सुनील दादा पाटील यांनी आपल्या अनोख्या वचन आणि साहित्य चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रभर साहित्य गणगोत जोडण्याचे काम केले आहे. शंभरापेक्षा जास्त दर्जेदार पुरस्काराचे ते मानकरी ठरलेले आहेत. अनेक सभा आणि संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. असे असतानाही साहित्यावरची निष्ठा तसूवरही कमी होऊ दिली नाही हे विशेष.

गावचा अंधार दूर करायला प्रत्येक बालकाच्या हातात पाटी आणि पुस्तकं यायला हवी असं ते फ्फक्त सांगून थांबले नाहीत तर आपल्या परीने प्रयत्न करत आहेत. त्यांनी अनेक लेखक घडवले. आपली वाचन संस्कृती समृद्ध करण्यासाठी सातत्याने विविध पातळ्यांवर प्रयत्नशील असतात. आपल्या देशातील विविध प्रादेशिक भाषांमधून त्यांनी साहित्य निर्मिती केली. २०१० पासून आजतागायत "कवितासागर सेवाभावी संस्थेच्या' माध्यमातून ते आपल्या पत्नीच्या मदतीने विविध शाळांच्या माध्यमातून "मुलांचे मोफत ग्रंथालय' चालवत आहोत. आजकाल वाचन संस्कृती लोप पावत चालल्याचे सर्वत्र सांगितले जात असले, तरी कोल्हापूर जिल्ह्यातील धरणगुत्ती येथील पाटील दांपत्याने या समजाला छेद दिला आहे. विद्यार्थ्यांनी आपला अमूल्य वेळ मोबाईल अथवा टीव्ही पाहण्यात वाया घालवू नये. त्याऐवजी त्यांनी उत्तमोत्तम पुस्तके वाचावीत म्हणून ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाच्या जोडीला अवांतर वाचनाची मोफत संधी देण्यासाठी पाटील दांपत्य अत्यंत प्रयत्नशील आहेत. आधुनिक जीवन पद्धतीत सात्विक जीवनासाठी वाचनाचे महत्त्व खूप मोठे आहे. वाचनाच्या छंदाचे जतन आणि संवर्धन करणे ही काळाची गरज असून, या पुढील काळात वाचनाचे महत्त्व सर्वांना समजून देण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी त्यांनी प्रत्येक शनिवार हा वाचन चळवळ आणि शालेय मुलांच्यावर सुसंस्कार व्हावेत यासाठी राखून ठेवला आहे; अशा पद्धतीने वर्षभरातील बावन्न दिवस डॉ. सुनील दादा पाटील आणि त्यांची सुविद्य पत्नी सौ. संजीवनी सुनील पाटील विनावेतन आपली निस्वार्थ सेवा विविध शाळांना देत आहेत.

प्रत्येक शनिवारी (काही कारणास्तव शनिवारी शाळांना सुट्टी असल्यास सोमवार किंवा त्यापुढील दिवस) ते विविध शाळांना भेटी देऊन तेथील मुलांना कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, सुविचार संग्रह, व्याकरण, भाषणांचा संग्रह, अनुवादीत साहित्य, विविध विषयावरील नियतकालिके, दिवाळी अंक आणि आरोग्य विषयक इत्यादि पुस्तकांचे वाटप करणे, वाचलेली पुस्तके परत घेऊन नवीन पुस्तके अदा करणे, पुस्तके वाचून मुलांनी लिहीलेल्या प्रतिक्रियांवर मुलांसोबत चर्चा करणे, निवडक प्रतिक्रिया पोस्टकार्डवर लिहून संबंधित लेखक/कवी यांना पाठविणे. तसेच मुलांना संस्काराच्या आणि सुविचारांच्या गोष्टी सांगून एक संस्कारक्षम आणि वैचारिक दृष्ट्या सक्षम पिढी घडवण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांच्या नाविन्यपूर्ण ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांना वाचनाची आणि लिहिण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यांचे कार्य नक्कीच कौतुकास्पद आहे.

**कवितासागर फिचर्स, जयसिंगपूर**
**पोस्ट बॉक्स ६९, नांदणी नाक्याजवळ, बायपास रोड, जयसिंगपूर - ४१६१०१, तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र**

# मजूर सहकारी संस्थेने १७ कोटी ५५ लाखांची कामे हडपली?

## सुशिक्षीत बेरोजगार अभियंते आणि नोंदणीकृत कंत्राटदारांवर अन्याय, जी.आर.ची पायमल्ली, सार्वजनिक बांधकाम विभागाचा प्रताप

**गोंदिया:** शासनाच्या जी.आर.नुसार सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, कामगार सहकारी संस्था व नोंदणीकृत कंत्राटदारांना खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे काम दिले जाते. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग गोंदियाच्या अ.विभाग क्रमांक २ या नवा कायदा समोर आला असून त्यात नियम डावलून १७ कोटी ५५ लाख रुपयांची कुशल कामे केवळ कामगार सहकारी संस्थेला देण्यात आली. त्यामुळे या प्रकरणात बेरोजगार अभियंते आणि नोंदणीकृत कंत्राटदारावर मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे गोंदिया जिल्ह्यातील दुर्गम भागाच्या विकासासाठी शासनाकडून विविध कामे मंजूर करण्यात आली असून त्यामध्ये सालेकसा तहसील अंतर्गत विविध सिमेंट रस्त्यांचा समावेश असून यामध्ये शासनाकडून १२ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. विभाग-२ मध्ये ५ कोटी ५ लाख रुपयांच्या कामांचा, ३० लाख रुपयांच्या ११ कामांचा आणि २५ लाख रुपयांच्या आणखी ७ कामांचा समावेश आहे. ज्यामध्ये देवरी तहसील, सडक अर्जुनी तहसील आणि सालेकसा तहसीलचा समावेश आहे.

शासन आदेशानुसार वरील कामांची तीन भागात विभागणी करावी लागेल. ज्यामध्ये ३३ टक्के कामगार सहकारी संस्था, ३३ टक्के सुशिक्षीत बेरोजगार अभियंते आणि ३४ टक्के काम नोंदणीकृत कंत्राटदारांना खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे वितरित केले जाते. मात्र नुकतेच गोंदियातील सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ ते १२ कोटी ५० लाख रुपयांच्या कामाचे तीन भाग न करता केवळ मजूर सहकारी संस्थेलाच वाटप केले जाते. त्यामुळे सुशिक्षीत बेरोजगार अभियंते व नोंदणीकृत कंत्राटदारांमध्ये नाराजी निर्माण होण्याबरोबररच अधिकारी व एका राजकीय पक्षाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या संगनमताने हा प्रकार घडत असल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणी सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांनीही शासनाला निवेदन देऊन माहिती दिली असून याप्रकरणी आपल्यावर अन्याय झाल्यास न्यायलयात जाऊन गुन्हा दाखल करु असा इशारा शासनाला दिल आहे.




### न्यायालयात याचिका दाखल करणार

गोंदिया जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेत कामांच्या वाटपात मोठ्या प्रमाणात अनियमितता असून सालेकसा तहसीलअंतर्गत १२ कोटी ५० लाख रुपयांच्या २५ कामांकडेही दुर्लक्ष होत आहे. याप्रकरणी शासनाला विनंती करण्यात येणार असून सुनावणी न झाल्यास याप्रकरणी न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार आहे.

महेश अग्रवाल, कोअर कमिटी सदस्य,
सुशिक्षीत बेरोजगार अभियंता संघटना, गोंदिया जिल्हा

### कामाच्या पुढील यादीत कामे दिले जाईल

१७ कोटी ५५ लाख रुपयांच्या कामांची प्रक्रिया झाली आहे. आगामी कामांच्या यदीत सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना प्राधान्य देऊन काम दिले जाणार आहे.

शालिक राव उसंडी,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ गोंदिया

### कार्यकारी अभियंत्याने न्यायालयात मागितली होती लेखी माफी

गेल्या काही वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रभाग क्रमांक एकमधील बेरोजगार अभियंत्यांवरही या प्रकारामुळे अन्याय झाला होता. त्यावर संघटनेने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तत्कालीन कार्यक़ारी अभियंता सोनाली चौहान यांनी न्यायलयात शपथपत्र देऊन सार्वजनिक बांधकाम विभाग बेरोजगार अभियंत्यावर अन्याय करणार नाही, अशी ग्वाही करुन न्यायलयाचा अवमान सुरु आहे. यासोबतच जिल्ह्यातील नगरपरिषद, जिल्ह परिषद, वनविभाग, पाटबंधारे विभाग, कृषी विभाग, आदींसह अन्य विभागातील भ्रष्टाचाराला चालना देऊन काम आयोगामुळे नेत्यांच्या दबावाखाली कामगार सहकारी संस्था व इतर कंत्राटदारांनी निविदा काढल्या आहेत.

### ५ कोटी ५ लाख रुपयांची १८ कामे

सार्वजनिक बांधकाम विभाग-२ मध्ये ५ कोटी रुपयांच्या कामांमध्ये ३० लाख रुपयांच्या ११ कामांचा आणि २५ लाख रुपयांच्या आणखी ७ कामांचा समावेश आहे. त्यात देवरी तहसील, सडक अर्जुनी तहसील व सालेकसा तहसीलचा समावेश आहे.

### १२.२५ ची ३० कोटी रुपयांची कामे

पांढरवाणी मार्गाच्या दुरुस्तीसाठी ५० लाख, पांढरवाणी ते मरजजोब पूल दुरुस्तीसाठी ५० लाख, भर्रीटोला ते मररजोब पूल दुरुस्तीसाठी ५० लाख, मसीटोला पंप हाऊसच्या दुरुस्तीसाठी ५० लाख, लोहारा मार्ग (लभंधरणी) दुरुस्तीसाठी ५० लाख, रस्ता ५० लाख, साईपाळा ते जोशीटोला रस्त्याची सुधारणा ५० लाख, इसानाटोला ते जोशीटोला रस्ता सुधारणेचे काम ५० लाख, इसानटोला कळव्याकडे जाणारा रस्ता ५० लाख, बंजारी मुख्य रस्ता ५० लाख, खडकीटोला बालकसर्रा रस्त्याच्या बांधकामासाठी ५० लाख, कोसमतर्रा मार्ग रस्ता बांधकामासाठी ५० लाख, पठाणटोला ते जमाकुडो मुरुम रस्ता बांधकामासाठी ५० लाख,कचारगड अप्रोच रस्त्याच्या बांधकामासाठी ५० लाख, दुरुस्तीसाठी ५० लाख तोंडगोची चे चांदसूरज पुल, मक्काटोला ते हेटीटोला रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ५० लाख, कोटरा ये शिवमंदिर रस्तयाच्या दुरुस्तीसाठी ५० लाख, बरकरीटोला ते नवाटोला पूल दुरुस्तीसाठी ५० लाख, तोयागोंदी मार्गाच्या दुरुस्तीसाठी ५० लाख, दहारटोला ते बंजारी स्त्याच्या दुरुस्तीसाठी ५० लाख, बिजेपार ते जाभुरटोला तलावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे सुधारणेचे काम ५० लाख, खालीहुडकी (पांडव वाणी) उपसा सिंचन काम ५० लाख, मरामजोब रस्ता सुधारणेसाठी ५० लाख, रुंगाटोला तिरखेडी ते कडोतीटोला रस्ता सुधारण्यासाठी ५० लाख, तिरखेडी ते ढिवरटोला रस्ता सुधारणेसाठी ५० लाख, रामाटोला ते कुलारभट्टी रस्ता सुधारणा कामासाठी ५० लाख रुपयांची गुंतवणूक आहे. ज्याची निविदा काही दिवसांपुर्वी प्रसिद्ध झाली होती. बेरोजगार अभियंते आणि नोंदणीकृत कंत्राटदारांसाठी कुशल काम शासनाच्या नियमानुसार कुशल व अकुशल कमाचे वर्गीकरण करण्यात आले असून त्यामध्ये कुशल कामांतर्गत सिमेंटचे काम, क्रांकीटीकरण, नवीन धरणाचे काम बेरोजगार अभियंता व नोंदणीकृत कंत्राटदारांना व अकुशल काम कामगार सहकारी संस्थांना दिले जाते. माती, नाला, गाळ काढणे, उभारणी यासारखी कामे केली जातात. मात्र त्यातही कुशल काम कामगार सहकारी संस्थेला देण्यात आल्याने या निविदा प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह होत आहे. कामांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह शासनाचा विकास निधीही लोक प्रतिनिधीकडून आपला विकास निधी म्हणून जाहीर करुन कामे कामगार सहकारी संस्थेच्या माध्यमातून त्यांच्या कार्यकर्त्यांना वाटली जात असल्याने कामांच्या दर्जावरी प्रश्नचिन्ह निर्माण होत असून शासनाचा कोट्यावधी रुपयांचा निधी दरवेळी वाया जात आहे. महसूलात वाढ होण्याबरोबरच निकृष्ट कामे होत असल्याने सर्वसामान्यांच्या कराच्या पैशाचा लोकप्रतिनिधी व सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून उघडपणे दुरुपयोग केला जात आहे. शासनाचे नियम शासकीय नियम आणि जीआर अंतर्गत कोणतेही काम तीन प्रकारात विभागले जाते. ज्यामध्ये ३३ टके सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना, ३३ टक्के मजूर सहकारी संस्थांना आणि ३४ टक्के नोंदणीकृत कंत्राटदारांना खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे दिले जाते. परंतु या निविदेत आणि या कामात नियमांचे खुलेआम उल्लघंन झाले आहे.

# जिपच्या शिक्षकाने केला अल्पवयीन विद्यार्थीनीचा विनयभंग



**गोंदिया:** - बदलापूर, अकोला, चंद्रपूर येथील घटना ताज्या असताना तालुक्यातील एका गावात जिल्हा परिषद शाळेत कार्यरत शिक्षकाने शाळेतीलच १६ वर्षीय विद्यार्थिनीच्या घरी जाऊन अश्लिल चाळे करून विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून तिरोडा पोलिसांनी आरोपी शिक्षकांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. उमेश टीकाराम मेश्राम (५०) रा. मेंढा ता. तिरोडा जि. गोंदिया असे अटक करण्यात आलेल्या आरोपी शिक्षकाचे नाव आहे.

सविस्तर असे की, पिडीता ही तालुक्यातील एका गावातील जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात अकराव्या वर्गाची विद्यार्थिनी आहे. आरोपी उमेश मेश्राम हा याच शाळेत वर्ग ५ ते ७ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिकवितो. २२ ऑगस्ट रोजी पिडीता ही शाळेला सुट्टी झाल्यानंतर घरी आली. गणवेश बदलून ती घराच्या हॉलमध्ये खुर्चीवर बसली असता आरोपी उमेशही तिथे आला व बेडवर बसला. दरम्यान उमेशने पिडीतेला दूर खुर्चीवर का बसली आहे, माझ्याजवळ येऊन बस असे म्हटले, मी तुझ्यावर प्रेम करतो, तुझे पण माझ्यावर प्रेम आहे का, प्रेमाला वयाचे बंधन नसते, असे म्हणून तिला मिठी मारली. अश्लील चाळे केले. तो एवढ्यावरच थांबला नाही तर पिडीता नकार देत असताना त्याने तिचे केश ओढून, पकडून त्याच्या मोबाईलवर अश्लील फोटो व चित्रफीत दाखवली. पिडीता प्रचंड घाबरली, सर तुम्ही माझे शिक्षक, गुरु आहात असं करू नका, माझा भाऊ आला असे म्हणून तिने आरोपीच्या तावडीतून आपली सुटका केली.

यानंतर पीडीतेचा भाऊ आल्यानंतर आरोपी त्याच्यासोबत बोलत बसला. यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी सातनंतर त्याने पीडितेच्या व्हाट्सअपवर अश्लील संदेश पाठविला. दरम्यान पीडीतेने घडलेला प्रकार तिच्या मानस भावाला सांगितला. दुसऱ्या दिवसी त्याने शाळा गाठून आरोपी उमेशला जाब विचारला. दरम्यान आरोपीने माफी मागितली व घडलेला प्रकार कोणालाही सांगू नका, अशी विनंती केली. पिडीता या प्रकाराने प्रचंड तनावात होती. यानंतर तिने ३० ऑगस्ट रोजी घडलेला प्रकार कुटुंबियांना सांगितला. तिने त्याच दिवशी कुटुंबीयांसह तिरोडा पोलीस स्टेशन गाठून आरोपी उमेश विरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी शिक्षक उमेशवर बाललैंगिक अत्याचार अधिनियम, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा व अधिनियमांसह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून मध्यरात्री अटक केली. आज आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी ठोठावली असून भंडारा जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. घटनेचा अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी साहिल झरकर यांच्या मार्गदर्शनात तिरोडा पोलिस करीत आहेत.

आरोपी शिक्षक उमेश मेश्राम गोंदिया जिल्हा परिषद शिक्षण विभाग अंतर्गत तिरोडा तालुक्यातील सुकळी (डाक) येथे कार्यरत आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल होऊन अटक झाल्याचे कळताच गोंदिया शिक्षण विभागाने तत्काळ प्रभावाने आरोपी शिक्षक मेश्रामला निलंबित केले आहे.

# नराधम आरोपीला १५ वर्षाचा सश्रम करावास

**गोंदिया:** एका सात वर्षीय बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला प्रमुख जिल्हा व विशेष सत्र न्यायधिश ए. टी. वानखेडे यांनी १५ वर्षाचा सश्रम कारावास व ९ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. हा निर्वाळा ३० ऑगस्ट रोजी दिला. नरेश भैय्यालाल जावळकर (३५) रा. गोंदिया असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

आरोपी नरेश जावळकर हा २८ ऑगस्ट २०१८ रोजी पीडित मुलीच्या घरी गेला. पीडिता तिच्या घरी फ्फुले तोडत असताना आरोपी नरेशने तिला भुलथापा देत घरात नेवून लैंगिक अत्याचार केला. यानंतर कुटुंबिय घरी आल्यानंतर पीडितेनेही घडलेला प्रकार कुटुंबियाना सांगितला.

दुसऱ्या दिवशी पिडीता व तिच्या आईने गंगाझरी पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी नितिन विनायक यादव यांनी प्रकरणाचा तपास करून आरोपीविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचार तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये विशेष न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

सरकारी वकिल कृष्णा पारधी यांनी ७ साक्षदारांना न्यायालयासमोर हजर केले. दोन्ही पक्षाच्या वकिलांकडून झालेल्या युक्तीवादानंतर साक्ष व पुराव्यावरून दोष सिद्ध झाला. न्या. वानखेडे यांनी कलम ३७६ (अ) (ब) सहकलम ५११ अंतर्गत १० वर्षाचा सश्रम कारावास व ५ हजार रुपयाचा दंड तसेच दंड न भरल्यास ४ महिन्याचा अतिरिक्त कारावास तसेच लैंगिक अत्याचार कायद्यान्वये ५ वर्षाचा सश्रम कारावास व ४ हजार रुपयाचा दंड, दंड न भरल्यास तीन महिन्याचा अतिरिक्त कारावास असा १५ वर्षाचा सश्रम कारावास व ९ हजार रुपयाचा दंड ठोठावला. दंडाची रक्कम पीडितेला देण्याचे आदेशीत केले. प्रकरणात पैरवी अधिकारी म्हणून पोलिस कर्मचारी धीरज तिवारी यांनी काम पाहिले.

# जातीनिहाय जनगणना करा, भाकपाचा उपविभागीय कार्यालयावर मोर्चा




**गोंदिया :** जातीय जनगणना करा, आरक्षणाची मर्यादा हटवा यासह इतर मागण्यांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने शुक्रवारी (दि. ३०) नेहरू चौकातून उपविभागीय कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

उपविभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून विविध मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले.

या वेळी दिलेल्या निवेदनातून जातीनिहाय जनगणना करा, आरक्षणाची ५० टक्के मर्यादा उठवा, सर्व कामगारांना पंचवीस हजार रुपये किमान वेतन करा, कष्टकरी वर्गाला ६० वर्षांनंतर पाच हजार रुपये पेन्शन द्या, कामगार भरती करा, महागाई कमी करा, कंत्राटीकरण खाजगीकरण थांबवा, प्रीपेड स्मार्ट मीटर लावण्याचा निर्णय मागे घ्या, महिलांवर वाढत्या अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध लावण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्या, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करा, मागेल त्याला रेशन द्या, शिक्षणाचे बाजारीकरण थांबवा, शेतीमालाला हमीभाव द्या, स्वामिनाथन आयोग लागू करा, अतिक्रमणधारक, वनजमीन, गायरान जमीनधारकांना पट्टे वाटप करा, घरकुल व निराधारांचे थकीत अनुदान त्वरित द्या, घरकुलसाठी पाच लाख रुपयांचे अनुदान, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या, जिल्हा परिषद शाळेचे खाजगीकरण बंद करा शेतमजुरांसाठी केंद्रीय कायदा करा प्राथमिक आरोग्य केंद्र व सरकारी दवाखान्यातील सर्व रिक्त पदे भरा आदी मागण्यांचा समावेश होता.

या आंदोलनाचे नेतृत्व हौसलाल रहांगडाले, मिलिंद गणवीर, रामचंद्र पाटील, करुणा गणवीर, परेश दुरुगवार, शेखर कनोजिया, प्रल्हाव उके, शालू कुथे, गुणंतराव नाईक अशोक मेश्राम, कल्पना डोंगरे, सुरेश रंगारी, पौर्णिमा चुटे यांनी केले.

# राष्ट्रीय महामार्गालगतच्या शेतीला मिळत आहे कोट्यावधीचा भाव

## मौक्याची जागा मिळणे झाले कठिण, गोंदियाच्या ग्रामीणपेक्षा आमगावात भाव अधिक

**गोंदिया:** जिल्ह्यात शहरी, ग्रामीण भागातील शेतजमिनीचे दर वेगवेगळे आहेत. परंतु गोंदिया-आमगाव महामार्गालगत असलेल्या जमिनीचे भाव कोट्यावधी रुपये एकरवर गेले आहेत.

गोंदिया शहर वगळता जिल्ह्यात आमगाव आणि आमगावलगत गावातील जमिनीचे भार गगनाला भिडले आहेत. व्यापारी वर्गाने भाव वाढविल्याने शेतकऱ्यांना आता जमीन घेणे कठिण झाले आहे. शेती खरेदी करताना जमिनीचा दर्जा, उत्पादन क्षमता, पाण्याची उपलब्धता पाहिली जाते. या मुद्यांसह बाजारपेठेचे अंतर, महामार्गालगत, गाव शहराजवळ असलेल्या जमिनीचे दर इतर जमिनीपेक्षा दुप्पट असल्याचे दिसून येते. माळनारानातील किंवा गावापासून दूर असलेल्या जमिनीचे भाव काही प्रमाणात कमी दिसतात. नव्याने जाहीर झालेल्या रेडिरेकनर दरात बागायती शेत जमिनीसह जिरायती जमिनीचे भावही वाढले आहेत. या भाव वाढीमुळे शासनाच्या महसूलातही वाढ होणार आहे.

### शेतीला कोणत्या तालुक्यात किती भाव?

एकरी लाखात

| तालुका | कोरडवाहू | सिंचनशेती |
|---|---|---|
| गोंदिया | १५ लाख | २० लाख |
| आमगाव | १३ लाख | १८ लाख |
| तिरोडा | १२ लाख | १८ लाख |
| गोरेगाव | १० लाख | १५ लाख |
| सडक-अर्जुनी | ११ लाख | १७ लाख |
| अर्जुनी-मोरगाव | ११ लाख | १६ लाख |
| देवरी | ९ लाख | १५ लाख |
| सालेकसा | ९ लाख | १५ लाख |

### सर्वात कमी भाव देवरी तालुक्यात



जिल्ह्यात शेतीला अत्यंत कमी भाव देवरी तालुक्यात आहे. आदिवासी तालुका म्हणून ओळख असलेल्या देवरी तालुक्यात पाहिजे त्या प्रमाणात सिंचनांची सोय करण्यात आली नाही. बहुतांश शेतकरी आजही वरथेंबी पावसावरच आपली पिके घेतात.

### पाच वर्षात वाढले शेतीचे भाव

मागील पाच वर्षाच्या कालावधीत अस्मानी-सुलतानी संकटांचा कहर होत. तर दुसरीकडे महागाईचा भस्मासून वाढत होता. यासह इतर विविध कारणांमुळे मागील पाच वर्षामध्ये शेतजमिनीचे भावही अधिक वाढले.

### रस्त्याशेयारी नदीकाठावर भाव अधिक

शेतीला येण्या-जाण्याची व सिंचनाची सोय असावी, म्हणून रस्त्यालगत असलेल्या शेतीला व नदीच्या काठावर सिंचनाची सोय आहे. म्हणून त्या शेतीला अधिक भाव मिळतो. दिवसेंदिवस भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर जात असल्याने नदी काठावरील शेती सिंचित करण्यासाठी अडचण निर्माण होत नाही. त्यामुळे त्या जमिनीचा अधिक भाव असतो.

### सर्वात जास्त भाव आमगाव तालुक्यात

गोंदिया शहर वगळता ग्रामीण भागाचा विचार केल्यास आमगाव तालुक्यात शेतजमिनीचे अधिक दर दिसून येतात. सर्वात कमी भाव देवरी तालुक्यात आहेत. रस्त्यालगत अलसेल्या जमिनीला लोकांची जास्त पसंती असल्याने त्या जमिनी खरेदी केल्या जातात. आत असलेल्या जमिनींना बरेच जण पसंत करीत नाही.

# तिरोडा येथे आदर्श शिक्षक व गुणवंत विद्यार्थांचा सत्कार

**तिरोडा:-** तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील प्राविण्य प्राप्त विद्यार्थी तसेच सत्र २०२३-२४ मध्ये मध्ये सेवानिवृत्त तसेच शिक्षण क्षेत्रात उत्कृस्ट कार्य केलेल्या शिक्षकांचा सत्कार कार्यक्रम दिनांक ०५ सप्टेंबर २०२४ रोज गुरुवारला दुपारी १२.०० वाजता ड्रीम गार्डेनलान तिरोडा येथे तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्यातर्फे आयोजित केलेला आहे

या कार्यक्रमाला प्रामुख्याने अध्यक्ष म्हणून डॉ.केशव भांडारकर, मा.संचालक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, तसेच उद्घाटक म्हणून विधानपरिषद सदस्य डॉ.परीणय फ्फुके, विशेष उपस्थिती म्हणून जी.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, एड. येसुलाल उपराडे, प्रमुख उपस्थिती मा. आमदार भजनदास वैद्य गुरुजी, हेमंत पटले, खोमेश्वर रहांगडाले, केशवरावी मानकर, कृबास सभापती जितेंद्र रहांगडाले, गिरधारी बघेले, सभापती संजय टेंभरे, सविता पुराम तसेच सर्व जी.प.सदस्य, प.स.सभापती, प.स.सदस्य व पदाधिकारी तसेच तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षक यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे.

# अबब...कालव्यात निर्माण झाले जंगल

## इटियाडोह धरण व कालवे फुटण्याचा वाढतोय धोका, विभागाचे प्रकाराकडे दुर्लक्ष

**अर्जुनी मोरगाव:** आपण जंगलातून कालवे गेल्याचे बघितले व ऐकले असेल. पण कालव्यात जंग़ल हा अगदी नवीनच प्रकार आहे. होय हे अगदी त्य आहे. इटियाडोह धरणाच्या कालव्यांमध्ये चक्क जंगल बघायला मिळते. या विभागाने निष्काळजीपणाची तर हद्द पार केली आहे. वन विभागाच्या अडचवणुकीमुळे पाळूवरूल झाडे कटाईची कामे होत नसल्याचे सांगून अधिकारी मोकळे होत आहेत. धरणाच्या मुख्य कालव्यावरील मोठ्या पाळूवन सुद्धा झाडे वाढली आहेत. वाढलेल्या मोठ्या झाडांची मुळे कालव्याच्या पाळीत घट्ट रुजल्याने पाळू फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामागे अधिकाऱ्याचे दुर्लक्ष कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे.



इटियाडोह धरणाची निर्मिती १९६७ मध्ये झाली. कालवे तयार झाले. या कालव्यांद्वारे गोंदिया, भंडारा व गडचिरोली जिल्ह्यातील शेतीला सिंचन होते. धरण व कालवे निर्मितीपासून डागडुजी झालीच नाही. धरण व कालव्यांच्या स्वच्छतेसाठी दरवर्षी शासनाकडून निधी प्राप्त होतो. मात्र हा निधी स्वच्छतेवर खर्च केलाच जात नाही. अन्यथा धरण व कालव्याची अशी दुर्दशा दृष्टीस आली नसती. गेल्या अनेक वर्षापासून कालव्यातील झाडांची कटाई करण्यातच आली नाही. त्यामुळे आज ही झाडे मोठी झाली अहेत. त्यांची मुळे पाळीतील मातील घट्ट रुजली आहेत. त्यामुळे सभोवतलाची जागा पोकळ होत असून धरण व कालवे फुटण्याची भीती सदैव असते. कालव्यावर पाळू फुटून शेत पिकांचे नुकसान झाल्याच्या घटना दरवर्षीघडत असतात. शेतकरी ओरड करतात. मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. चार ते पाच वर्षापुर्वी धरणाच्या पाळूवर वाढलेल्या झाडे वाढली होती. लगेच पाटबंधारे विभागाचे मुख्य धरणच्या पाळूवरील ती झाडे कापली होती. मात्र आता ती झाडे परत वाढली आहेत.

धरणाच्या कालव्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर झाडे उगवली आहेत. झाडांच्या भरगच्च दाटीमुळे येथे कालवा आहे हे दिसतच नाही. कालव्यात अगदी मोठे जंगलच झाले आहे. ही महिला दोन महिन्यातच एवढी मोठी झाडे झाली नाहीत. अनेक वर्षापासूनची ही झाडे आहेत. झाडांची कापणी व छाटणी वर्षानुवर्षापासून झालीच नाही. यात नेमकी कोणत्या जातीची झाडे आहेत हे बघणे सुद्धा इच्ट ठरेल. कारण झाडांची कत्तल होत असल्याने वन विभाग सुद्धा अडथडा आणण्याची शक्यता नाकारता येत नाही. झाडांची मुळे कालव्याच्या पाळूवरील जमिनीत खोलवर गेली आहेत. त्यामुळे अशा झाडांना मुळासकट बाहेर काढून फेकण्याचे मोठे आव्हान पाटबंधारे विभागावर आहे.

### दुरुस्तीसाठीचा पैसा जातो कोठे?

मुळे खोलवर गेल्याने कालव्याच्या पाळीला धोका निर्माण होतो. शिवाय, पाळीवरील अनावश्यक झाडे हेच पाणी मुळांपर्यंत शोधून घेतात. यामुळेही पाण्याचा बराच अपव्यय होतो. कालव्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी दरवर्षी शासनाकडून निधी प्राप्त होतो. तरीसुद्धा पाळूवरील झाडे कापली जात नसतील याला शेतकऱ्यांचे दुदैवच म्हणावे लागेल. शेतकऱ्यांचे हित साधणाऱ्या या विभागाकडून हे अपेक्षित नाही. शासनाकडून कालव्याच्या दुरुस्तीसाठी आलेला पैसा कुणाच्या घशात जातो, याची चौकशी होणे गरजेचे आहे.

### वनविभाग करतोय अडवणूक-शेंडे

धरण किंवा कालवे क्षेत्रात झाडे कापण्यासाठी वन विभाग अडवणूक करतो. कालव्यांची थोडीशी तुटफुट झाली तरीही आम्हाला वन विभागामुळे कामे करता येत नाहीत. ही बाब उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांना कळविली आहे. पाळूवरील झाडे काढणे अत्यंत आवश्यक आहेत. धरण आमचा, कालवे आमचे आणि आम्ही शेतकऱ्यांना पाणी देतो असे सांगूनही वन विभाग ऐकत नाही. अशी प्रतिक्रीया इटियाडोह पाटबंधारे व्यवस्थापन उपविभामाचे उपविभागीय अभियंता शेंडे यांनी सांगितले.

# ६५ ग्रामपंचायती झाल्या क्षयरोगमुक्त

## व्यापक जनजागृतीवर भर, ग्रामपंचायतींचा करणार गौरव

**गोंदिया:** राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमात सन २०२३ मध्ये जिल्हा परिषदेचे आरोग्य विभागाच्या माध्यमातून जिल्ह्यात टीबी मुक्त गाव या संकल्पनेतून टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियान राबविले. यात ६५ ग्रामपंचायतीने क्षयरोग मुक्त होण्याचा मान मिळवला आहे. या सर्व ग्रामपंचायतींना गौरवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांनी दिली आहे.



या उपक्रमामध्ये प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात क्षय रुग्णांचा शोध घेतला जात आहे. तसेच जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. यासाठी गोंदिया जिल्ह्यात क्षयरोग केंद्रातील डॉ.वेदप्रकाश चौरागडे, डॉ. देव चांदेवार यांच्यासह या अभियानासंबंधी पर्यवेक्षक करीत आहे. या उपक्रमामध्ये टीबीमुक्त ग्रामपंचायतीसाठी क्षयरोगाचे निकष पूर्ण केल्यास ग्रामपंचायत स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतात.

या उपक्रमात हजार लोकसंख्येमध्ये कमीत कमी टीबी संशयित क्षयरुग्न शोधून त्यांची थुंकी नमुन्याची तपासणी करावयाची आहे. त्यात एक किंवा कमी निरंक रुग्ण आढळल्यास ग्रामपंचायत पात्र ठरणार आहे. या ग्रामपंचायतीचे पडताळणी सुरु असून, स्पर्धेत पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींना पहिल्या वर्षी टीबी मुक्त असल्यास कांस्यपदक दुसऱ्या वर्षी टीबीमुक्त असल्यास रजत आणि तिसऱ्या वर्षी टीबीमुक्त राहिल्यास सुदर्णपदक टेऊन गौरविण्यात येणार आहे. टीबी मुक्त गाव अभियानातील उपक्रम आरोग्य विभागाने काटेकोरपणे राबविल्याने ग्रामपंचायती टीबी मुक्त झाल्या आहेत.

यात गावपातळी वरची आशासेविकापासून उपकेंद्र स्तरावरील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यसेवक, आरोग्यसेविका तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील वैद्यकीय अधिकारी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आशा गटप्रवर्तक व सर्वच क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योगदान दिले असल्याचे डॉ. गोल्हार यांनी सांगितले

# ओबीसी मुख्यमंत्री बहुजन सरकारची संकल्पना मांडण्यासाठी ओबीसी बहुजन पार्टी

## राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार प्रकाश अण्णा शेंडगे यांची भूमिका




**नागपूर:-** महाराष्ट्रामध्ये येत्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत.त्यातच ओबीसीना हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नरत असलेले ओबीसी जन मोर्चा,ओबीसी बहुजन पार्टी,संयुक्त राष्ट्र मोर्चा भारत आणि सम विच-ारधारी संघटनांचे महत्त्वपूर्ण बैठक रवी भवन नागपूर येथे रविवारला पार पडली.या बैठकीत राज्यातील सरकारने ओबीसींचे ७२ वसतिगृह सुरु करण्याची घोषणा दोन वर्षापुर्वी केली,मात्रअद्यापही एकही वसतिगृह दोन वर्ष लोटूनही सुरु न झाल्याने सरकारच्या ओबीसी विद्यार्थी विरोधी भूमिकेचा निषेध नोंदवत ओबीसी विद्यार्थ्याकरींता वसतिगृहाची दारे उघडणार्या अधिकार्याला निलबिंत करुन म हायुती सरकारने सरकार हे ओबीसी विरोधी असल्याचे सिध्द केल्याची टिका या बैठकित अनेकांनी व्यक्त केली.

सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी ओबीसी जनमोर्चा व ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार प्रकाश अण्णा शेंडगे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर गोरे,नागपूर विभाग अध्यक्ष प्रा.डॉ.एड रमेश पिसे,राष्ट्रिय सयुंक्त मोर्च्याचे राष्ट्रिय समन्वयक गोपाल ऋषीकर भारती,ओबीसी जनमोर्चा महिला आघाडी अध्यक्ष सुनिता काळे,ओबीसी जनमोर्चा प्रदेश उपाध्यक्ष डॉ.व्हि.डी.काळे,लोक जागर पक्षाचे अध्यक्ष प्रा.ज्ञानेश वाकुडकर मंचावर उपस्थित होते.

# क वर्गातील वृत्तपत्रांना विशेष प्रसिध्दी मोहिमेतून वगळले

## राज्य सरकारकडून छोट्या वृत्तपत्रांना सावत्रपणाची वागणूक, राज्यातील छोटी वृत्तपत्रं मंत्र्यासहित शासकिय बातम्यावर बहिष्कार टाकणार

**गोंदिया:** आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या विविध विभागांच्या योजनांची प्रसिध्दी करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यावतीने विशेष जाहिरात प्रसिद्धी मोहीम राबविण्यात येणार असून, यासाठी राज्य सरकारकडून कोट्यवधीच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. मात्र या प्रसिद्धी मोहिमेतून क वर्गातील लहान वृत्तपत्रे व साप्ताहिके यांना वगळण्यात आले असून. राज्यातील मोठ्या व भांडवलीदारी वृत्तपत्रांनाच या जाहिराती देण्यात येणार असल्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे. त्यामुळें राज्यांतील छोठ्या वृत्तपत्रावर अन्याय होत असून, एक प्रकारे राज्य सरकारकडून सावत्रपणाची वागणूक मिळत असल्याने छोट्या वृत्तपत्र चालकाकडून याचा निषेध व्यक्त केला जात असून, या विशेष प्रसिध्दी मोहिमेत क वर्गांतील वृत्तपत्राचा समावेश न केल्यास आगामी काळात सरकारच्या मंत्र्याच्या तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयच्या शासकिय बातम्यांवर राज्यभरातील छोटी वृत्तपत्र बहिष्कार टाकतील असा इशारा राज्यभरातील क वर्ग संपादक संघाच्या वतीने देण्यात आला आहे.देण्यात आला आहे.

निवडणुकपूर्व वातावरनात शासनाकडून मोठमोठ्या योजनांच्या घोषणा केल्या जात असून त्याच्या प्रसिद्धीसाठी मोठ्या प्रमाणावर जाहिरातही केली जात आहे. मात्र शासनाकडून नेहमीच आणि निवडणूक पूर्व वातावरणातही जाहिरात वाटप करताना समन्यायी पद्धतीने वाटप न करता छोट्या क वर्गीय दैनिकांवर अन्याय होत असल्याचे दिसत आहे.

शासन या सर्व जाहिराती केवळ मोठ्या म्हणजे अ व ब वर्गीय मोठ्या वृत्तपत्रानांच देत आहे. राज्यकर्त्यांचा कोणीतरी ही छोटी जिल्हा दैनिके कोणी वाचतच नाही असा गैरसमज करून दिला आहे. त्यामुळे बहुतेक जाहिरातिसाठी क वर्गीय वृत्तपत्रांना डावलले जात आहे.

वास्तविक ही छोटी जिल्हा वृत्तपत्रेच स्थानिकची म्हणून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वाचली जातात ही वस्तुस्थिती असून शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यावतीने देण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लेख, वृत्त यांना जशास तसे प्रसिद्धी देण्याचं काम हीच छोटी वृत्तपत्रं करीत असतात. हि वृत्तपत्र म्हणजे शासनाचं दुत म्हणून काम करत असतानाही सरकारकडून छोट्या वृत्तपत्रांना सावत्रपणाची वागणूक देत आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारकडून राबविण्यात येणा?या विविध विभागांच्या योजनांची प्रसिध्दी करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यावतीने विशेष जाहिरात प्रसिद्धी मोहीम राबविण्यात येणार असून, यासाठी राज्य सरकारकडून कोट्यवधीच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. काही दिवसापूर्वीच मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेच्या प्रसिद्धीसाठी कोट्यावधी रुपयाची निधीची तरतूद करून यामध्ये केवळ अ आणि ब वर्गातील वृत्तपत्रांना जाहिराती देण्याचे धोरण आखले आहे त्यामुळे वर्ग वृत्तपत्रावर मोठा अन्याय होत असल्याची भावना निर्माण होत होत असून राज्य सरकार बद्दल छोट्या वृत्तांतपत्रांमध्ये मोठा संताप व्यक्त केला जात आहे. क वर्ग लघु वृत्तपत्रांवरील हा अन्याय दूर झाला नाही तर आपल्या सरकारबद्दल नकारात्मक प्रसिध्दी होईल आणि त्याचे पडसाद गाव पातळीवर छोट्या वृत्तपत्रात उमटतील याची नोंद घेऊन झालेला अन्याय दूर करावा अशी मागणी राज्यातील छोट्या वृत्तपत्र चालकाकडून होत आहे.

या विशेष प्रसिध्दी मोहिमेतून क वर्गातील लहान वृत्तपत्रे व साप्ताहिके यांना वगळण्यात आले असून. राज्यातील मोठ्या व भांडवलीदारी वृत्तपत्रांनाच या जाहिराती देण्यात येणार असल्याचे शासन निर्णय काढण्यात आला आहे. त्यामधून शासनमान्य क वर्गातील दैनिके व साप्ताहिकांना जाणीवपूर्वक डावळले आहे.

येत्या आठवड्यात साप्ताहिक व लघु दैनिकांचा विशेष जाहिरात प्रसिद्धी मोहिमेत समावेश न केल्यास सप्टेंबरपासुन राज्य शासनाच्या मंत्रीमंडळातील मुख्यमंत्री, उपमुख्य मंत्री आणि सर्व मंत्र्याच्या शासकिय बातम्यांवर बहिष्कार टाकण्यात येईल असा इशारा राज्यभरातील क वर्ग वृत्तपत्राच्या संपादकांनी मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

# राजकीय स्वार्थासाठी संविधान आणि बाबासाहेबांचा अपमान कॉंग्रेसने केला-बडोले



**अर्जुनी मोरगाव:-** स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली.कोणतेही अंतर्गत युद्धनाही,यादवी माजली नाही. संसद,न्यायपालिका आणि कार्यपालिका अखंड सुरू आहे. देशातील नागरिक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. याचे श्रेय भारतीय राज्यघटनेला जाते. भारतीय राज्यघटना वज्रासारखी कठीण आहे. घटना बद्दलविण्याचे अधिकार कुणालाही नाही. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना मूलभूत अधिकार प्रदान केले आहे. मात्र आणीबाणीच्या काळात ४२ वी घटनादुरुस्ती करून केवळ राजकीय फक्रायदा लाटण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी संविधान पायदळी तुडविण्याचे महापाप केले. पवित्र लोकशाहीचे हुकूमशाहीत रूपांतरण करण्यात आले होते ही खरी लोकशाहीची हत्या होती. बाबासाहेबांना १९५२ मध्ये मुंबई मधून आणि १९५६ ला भंडारा जिल्ह्यामधून लोकसभेच्या निवडणुकीत हरविण्याचे काम नेहरूंनी केले. बाबासाहेबांना भारतरत्न दिला नाही.संविधान आणि बाबासाहेबांचा वारंवार अपमान करणाऱ्या कॉंग्रेसला धडा शिकविण्याची गरज असल्याचा घणाघात माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी केला.

ते स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती येथे संविधान जागर यात्रेच्या स्वागताप्रसंगी बोलत होते.यावेळी बीडचे मानव अधिकार कार्यकर्ता ॲड. वाल्मीक निकाळजे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नातू राजेंद्र गायकवाड,आधार महिला कौशल विकास केंद्र मुंबईच्या योजना ठोकळे, घे भरारी महिला बचत गट फेडरेशन मुंबईच्या स्नेहा भालेराव, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे शरद कांबळे, विजय गव्हाळे, नागसेन पुंडके, आकाश अंभोरे उपस्थित होते. बडोले पुढे म्हणाले, १९६७ ला गोरखनाथ विरुद्ध पंजाब सरकार या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला नागरिकांच्या मूलभूत हक्कांमध्ये कुठलाही बदल संसदेला करता येणार नाही. १९७० ला केरळ सरकारने धामिक संस्थांच्या मालकीच्या जमिनीवर निर्बंध लादले. या विरोधात केसवानंद भारती यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये खटला दाखल केला. संविधानाच्या मूलभूत संरचना सिद्धांताचा प्रस्ताव मांडला. २४ एप्रिल १९७३ ला सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा क्रांतिकारी आहे. संसद सर्वशक्तिमान असली तरी घटनेच्या संरचनेत बदल करण्याचे अधिकार नाहीत हे या निकालावरून सिद्ध झाले.

सर्वोच्च न्यायालयाला संविधानाच्या पालकत्वाचा दर्जा मिळाला. कुठलेही सरकार बहुमताच्या आधारावर मनमानी करीत घटना बदल करू शकत नाही हे निश्चित झाले.जयप्रकाश नारायण यांच्या याचीकेनुसार १९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना सर्वोच्च न्यायालयात जवाब नोंदवीण्यासाठी हजर राहावे लागले होते.कॅबिनेटला विचारात न घेता पद वाचविण्यासाठी इंदिरा गांधींनी राष्ट्रीय आणीबाणी लागू केली. राजकिय लाभासाठी ३८,३९,४०,४१ आणि ४३ व्या घटना दुरुस्तीनुसार नागरिकांचे अधिकार गोठवून अनेक घटनाबाह्य बदल करण्यात आले.प्राताविकेत बदल केला.इंदिरा गांधी ४०, राजीव गांधींच्या काळात ११,मनमोहन सिंग काळात ७ वेळा कॉंग्रेसने राजकीय हेतूने घटनादुरुस्त्या केल्या.एससी एसटी ओबीसी चे खरे शत्रू कोण हे ओळखण्याची गरज आहे. कॉंग्रेसने एससी एसटी ओबीसी चे अधिकाऱ्यांचे हलन केले.

१९७७ मध्ये भाजपच्या जनता सरकारने ४४ वी घटना दुरुस्ती करून कॉंग्रेसने दूषित केलेली भारतीय राज्यघटना मूळ स्वरूपात आणली. मोदींनी दहा वर्षाच्या काळात सात वेळा लोकहिताच्या, देशहिताच्या घटना दुरुस्त्या केल्या. १९३० नंतर कॉंग्रेसच्या काळात कधी जनगणना झाली नाही मात्र जनगणनेचा कांगावा करतात. एससी, एसटी ला दहा वर्षांच्या आरक्षणाची मुदत वाढ, ओबीसींना पहिल्यांदा आरक्षण देण्याचे काम भाजपा ने केले. बाबासाहेबांना भारतरत्न देण्याचे काम भाजपच्या काळात झाले.

महाड येथून आलेल्या संविधान जागर यात्रेचे तालुक्यातील गौरनगर येथे जोरदार स्वागत करण्यात आले.संचालन गटनेते लायकराम भेंडारकर, आभार महामंत्री डॉ.नाजूक कुंभरे यांनी केले.कार्यक्रमाला तालुक्यातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# लाडकी बहिणींचाच गजावाजा, गरिबांच्या जेवणाचे पैसे शासनाने दिलेच नाही!

## चार महिन्यांचे अनुदान मिळाले नाही, २४ केंद्रावरुन जिल्ह्यात शिव भोजन सुरुच

**गोंदिया:** शासनाकडून गरिबांसाठी शिवभोजन योजना राबविली जात आहे. त्यानुसार दुपारी १२ ते ३ या वेळेत येणाऱ्या गरिबांना मध्यान्ह भोजनाचे वाटप केले जाते. त्यामुळे पोटासाठी भ्रांत असलेल्यांना जेवणाचा लाभ मिळत आहे. दरम्यान, गेल्या चार महिन्यांपासून अनुदान न मिळाल्यामुळे दररोज २०५० जणांचे पोट कसे भरणार, असा सवाल केला जात आहे. सरकारने लाडकी बहीण योजना सुरु करुन दीड हजार रुपये महिलांना देण्याच्या नादात गरिबांना उपाशीच ठेवण्याचा पायंडा सुरु केला आहे.

महाविकास आघाडी सरकारने शिवभोजन ही योजना राबवायला सुरुवात केली. त्यामुळे गरीब नागरिकांना दुपारच्या जेवणाची सोय झाली. जिल्ह्यात २४ शिवभोजन केंद्र



आहेत. पहिले येणाऱ्या लाभार्थीला प्राधान्य य तत्वानुसार दुपारी १ ते ३ या वेळेत शिवभोजन दिले जाते. त्यामध्ये वरण-भात, भाजी आणि दोन चपात्या या पदार्थाचा समावेश आहे. कोरोनाच्या काळात कुणीही उपाशीपोटी राहू नये, यासाठी राज्य शासनाने शिवभोजन थाळी सुरु केली. यासाठी मोठ्या प्रमाणात शिवभोजन केंद्र सुरु करण्यात आले. या योजनेला शिंदे सरकारने पुढे सुरुच ठेवले. परंतु लाडक्या बहिणीच्या नादात सरकार गरिबांना जेवणाचे पैसे देण्यास विसरले आहे.

### शिवभोजन केंद्रांना चार महिन्यांपासून अनुदान नाही

एप्रिल महिन्यापर्यंतचे अनुदान शिवभोजन केंद्रचालकांना दिले होते. आता मे ते ऑगस्ट या चार महिन्यांचे अनुदान अद्याप मिळालेले नाही. त्यामुळे केंद्रचालकांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत.

### महागाईमुळे ५० रुपयांतही परवडेना

एका थाळीमागे शासन ४० रुपये अनुदान देते. १० रुपये लाभार्थीकडून घेतले जातात. या अनुदानातून शिवभोजन केंद्र चालवले जातात. शिवभोजन केंद्रांवरुन १० रुपयांत लोकांना हे भोजन मिळते. परंतु महागाईच्या काळात हे परवडत नाही.

### केंद्रचालक म्हणतात

आमच्या खिशातून पैसे खर्च करुन शिवभोजन लाभार्थींना दिले. एप्रिलपर्यंतचे पैसे मिळाले. त्यानंतरचे आले नाही. शिवभोजन केंद्र चालविण्यासाठी आम्हाला खिशातून पैसे लावावे लागत आहेत.

माया शिवणकर, शिवभोजन केंद्रचालक, देवरी रोड आमगाव

शासन लवकरच निधी देईल, अशी आम्हाला आशा आहे. लोक उपाशी राहू नये, म्हणून आम्ही शिवभोजन केंद्रातून गोरगरिबांना जेवण पुरवत आहोत. नियमित जेवण देण्याची सोय आम्ही केली आहे.

कगेश राव, शिवभोजन केंद्रचालक, आमगाव

### दररोज २०५० लोकांच्या जेवणाची सोय

जिल्ह्यात दररोज २०५० जणांच्या जेवणाची सोय करण्यात येते. जिल्ह्यात महिन्याकाठी लाखो लोकांना शिवभोजन केंद्राच्या माध्यमातून भोजन देण्यात येते.

### प्रत्येक शाळीमागे ४० रुपये अनुदान

एका शाळीमागे शासन ४० रुपये अनुदान देते. १० रुपये लाभार्थीकडून घेतले जातात. या अनुदानातून शिवभोजन केंद्र चालविले जातात. शिवभोजन केंद्रावरुन वरण-भात, भाजी आणि दोन चपात्या दिल्या जातात. १० रुपये मोजून लोकांना हे भोजन मिळते.

### १० रुपयांत जेवन, पण केंद्रचालकांना निधीच नाही

गोरगरिबांना पोटभर अन्न मिळावे, म्हणून महाराष्ट्र सरकारने शिवभोजन केंद्र सुरु केले आहे. १० रुपयांत पोटभर जेवण देण्याची सोय महाराष्ट्र सरकारने केली आहे.

मे ते ऑगस्ट या चार महिन्यांचे शिवभोजन केंद्राचे पैसे केंद्रचालकांना मिळाले नसल्याने आणखी किती दिवस आपल्या खिशातून पैसे खर्च करुन जेवण चारावे असा सवाल केंद्रचालकांकडून होत आहे.

### जिल्ह्यात २४ केंद्र

जिल्ह्यात २४ केंद्राच्या माध्यमातून गरजूंसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. राज्य शासनाच्या या उपक्रमाचा गरजूंना मोठा आधार झाला व त्यांच्या दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न सुटला होता.

# नंगपुरा मुर्रीतील सरकारी जमीन मिळंकृत

## भूखंड अतिक्रमणाच्या विळख्यात, जमिनीचे दर गगनाला भिडले



**गोंदिया:** शहराच्य पश्चिम भागाला असलेल्या मुर्री नंगपुरा गावात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले. ते अतिक्रमण काढण्यासंदर्भात ग्रामपंचायत प्रशासनाकडे मागणी करण्यात आली होती. परंतु त्या मागणीकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांचा आहे. शहराला लागून असलेल्या नंगपुरा मुर्री ही मोठी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायत अंतर्गत एफसीआयचे गोदाम, तसेच शासकीय वसतिगृह या सारख्या संस्था आहेत. या शिवाय शहरातील अनेक व्यापाऱ्यांचे गोदामही आहेत. मात्र, मागील काही वर्षापासून गावात अतिक्रमणाला जोर आला आहे. याबाबतची तक्रार ग्रामपंचायत तसेच संबंधित यंत्रणेला करण्यात आली. परंतु, अद्यापही याची दखल घेण्यात आली नाही. शहराला लागून असल्याने नंगपुरा मुर्री या ग्रामपंचायतीला वेगळे महत्व प्राप्त आहे.

गावातील जमिनीचे दर गगनाला भिडले आहेत. याच संधीचा लाभ घेत गावात अतिक्रमणाचा जोर वाढला आहे. अतिक्रमण करणाऱ्यांची यादी निवेदनाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीसह जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, खंडविकास अधिकारी यांना देण्यात आली होती. मात्र, तक्रारीनंतर प्रशासकीय यंत्रणा कोणतीही कारवाई करण्यास पुढे आलेली नाही. जर या प्रकारावर आळा बसला नाही तर गावात असलेली खुली शासकीय जागा शिल्लक राहणार नाही. अशी भिती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

### रेती व गिट्टीची अवैध साठवणूक

**अतिक्रमण केल्यानंतर अनेकांनी उर्वरित शासकीय जागेवर अनेक ठिकाणी रेतीचा व गिट्टीचा अवैध साठा ठेवण्यात आला आहे. रेती तस्करांनी पावळ्या-पुर्वीच हा साठा करुन ठेवला आहे. एकीकडे महसूल विभाग ग्रामीण भागा-तील ट्रॅक्टर चालकांना अवैधरित्या रेती वाहतूक प्रकरणी कारवाई करते. तर दुसरीकडे अवैधरित्या ठेवलेला शासकीय जागेवरील रेती व गिट्टीचा अवैध साठ्यावर कारवाई का करीत नाही? असा सवालही ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.**

# राज्यात अनु. जमातीचे ८० हजार पदे रिक्त

**गोंदिया:** महाराष्ट्रात आरक्षणाचा आणि शासनाच्या सेवेतील विविध संवर्गातील आरक्षित जागांवर पदभरतीचा विषय सध्या निवडणुकीच्या तोंडावर जोर धरत आहे. राज्यात अनुसूचित जमातीची ८० हजाराहून अधिक शासकीय पदे रिक्त असून यासाठी उच्च न्यायालयात आफ्रोट संघटनेने जनहित याचिका दाखल केली आहे. परभरतीकडे शासनाने जाणीवपूर्वक कानाडोळा करीत असल्याचा आरोपही संघटनेने केला आहे.

मुख्य सचिवांनी राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाला ३१ ऑगस्ट २०२० रोजीची भरलेल्या व रिक्तपदांची माहिती आयोगापुढे सादर केली. त्यात अनुसूचित जमातीची १ लाख ५५ हजार ६९६ पदे असून त्यातील १ लाख पदे भरण्यात आलेली आहेत. त्यापैकी ५५ हजार ६८७ पदे रिक्त आहेत. भरलेल्या पदांपैकी राज्यातील जात पडताळणी समित्यांकडे आजमितीस १० हजार ते १२ हजार प्रकरणे कोणत्याही निर्णयाविना प्रलंबित आहेत. राज्यात अनुसूचित जमातीचे ८० हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. राज्यात जात पडताळणीचा कायदा अस्तित्वात असताना अनेक कर्मचाऱ्यांनी जमातीचा दावाच पडताळणी समित्यांकडे सादर केला नाही.

त्यामुळे शासनाला ही पदे अद्याप रिक्त करुन अनुसूचित जमातीच्या संवर्गातून भरता आली नाही. अनुसूचित जमातीची अशी किमान ८० हजाराहून अधिक विविध संवर्गातील पदे रिक्त असून ती राज्य लोकसेवा आयोगातर्फे किंवा सरळसेवेने भरण्याचे कोणतेही प्रयत्न शासन करीत नसल्याचा आरोप ऑर्गनायझेशन फॉर राइटर-ऑफ ट्रायबल (आफ्रोट) संघटनेचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र मरसकोल्हे यांनी केला आहे.

शासकीय, निमशासकीय आणि खासगी अनुदानित प्राधिकरणातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण देणाऱ्या ५ जुन २०१८ च्या शासन निर्णयाला आफ्रोटचे अध्यक्ष ॲड. मरसकोल्हे यांनी मुंबई उच्च न्यायलयाच्या नागपुर खंडपीठात रिट याचिका ३१४२/२०१८ दाखल करुन आव्हान दिले आहे.

आदिवासींच्या आरक्षणाची ८० हजाराहून अधिक नोकरीतील पदे रिक्त असल्याने विशेष पदभरतीसाठी संघटनेच्यावतीने शिक्षित बेरोजगार आदिवासी तरुणांना न्याय देण्यासाठी पुन्हा उच्च न्यायालयात आफ्रोट संघटनेने धाव घेतली असून ही याचिका न्या. नितीन सांबरे व न्या. अभय मंत्री यांचेपुढे १० सप्टेंबर २०२४ रोजी सुनावणीसाठी येणार असल्याचे ॲड. मरसकोल्हे यांनी सांगितले.

**२१ डिसेंबर २०१९ वा शासन निर्णय तसेच १४ डिसेंबर २०२२ चा शासन निर्णयामध्ये आदिवासी तरुणांच्या पदभरतीबाबत कार्यक्रम पत्रिका दिलेली असतानासुद्धा महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागात रिक्त असणाऱ्या जागेवर पर भरती न होणे ही आदिवासी समाजातील शिक्षित तरुणांची थट्टा करण्याचा प्रकार राज्य शासनाने चाल-वला आहे. त्यामुळे आदिवासींच्या हक्काची ८० हजाराहून अधिक रिक्त पदे तत्काळ भरण्यात यावी.**

**विजय कुमरे, अध्यक्ष आफ्रोट, चंद्रपु**



# राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेंतर्गत कार्यशाळा संपन्न

**गोंदिया :** राष्ट्रीय पशु-धन अभियान योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात २७ ऑगस्टला एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.तानाजी लोखंडे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. जे.के.तिटमे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.कांतीलाल पटले उपस्थित होते.




यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.तानाजी लोखंडे यांनी कुक्कुट पालन, शेळी/मेंढी पालन, वराह पालन, पशु खाद्य व वैरण आदी योजनेचा लाभार्थ्यांना लाभ घेण्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेविषयी तांत्रिक मार्गदर्शन सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ.संजय गायगवळी यांनी केले. सदर अभियानांतर्गत विविध उद्योगाबाबत प्रकल्प अहवाल तयार करण्याविषयी भुपेंद्र पुंडे यांनी मार्गदर्शन केले. शेळी/मेंढी पालन या विषयावर पशुवैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथील सहायक प्राध्यापक डॉ.गिरीधर शेंडे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

या योजने अंतर्गत अनुदान हे ५० - ५० टक्के अशा दोन टप्प्यात देण्यात येते. अनुदानाचा ५० टक्क्याचा पहिला टप्पा हा केंद्र शासनाने प्रकल्प मंजूर केल्यावर, अर्जदाराने प्रकल्पाचे बांधकाम सुरु केल्यानंतर जिल्हा समितीचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावर देण्यात येतो. अनुदानाचा ५० टक्क्याचा दुसरा व अंतिम टप्पा हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर व सर्व देयके सादर केल्यावर देण्यात येतो. प्रकल्पाकरीता सर्व प्रवर्गातील लाभार्थी लाभ घेण्यास पात्र असतील. सर्वांना अनुदानाची मर्यादा सारख्या प्रमाणात आहे. एक व्यक्ती एकापेक्षा जास्त प्रकल्पासाठी अर्ज करु शकतो. अर्जदाराने ु.पश्रा.ीवूराळाळीीर.ळप या पोर्टलवर अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. जे.के.तिटमे यांनी केले. संचालन पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. प्रकाश गंगापारी यांनी केले. कार्यक्रमास राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेअंतर्गत अर्ज केलेले व लाभ घेण्यास इच्छुक शेतकरी व गोपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. संजय गायगवळी यांनी मानले.

# अंतिम मतदार यादी प्रसिद्ध,मतदाराची एकूण संख्या ९९ लाख ९९ हजार ५९३

**गोंदिया :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १ जुलै २०२४ च्या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादी दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार ३० ऑगस्ट २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.



प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीतील मतदाराची एकूण संख्या ११ लाख ११ हजार ५१३ असून यामध्ये ५ लाख ४८ हजार २२७ पुरुष, ५ लाख ६३ हजार २७४ स्त्री व इतर १२ मतदारांचा समावेश आहे.

६३-अर्जुनी मोरगाव मतदार संघामध्ये २ लाख ५६ हजार ९५३ मतदार आहेत. यामध्ये १ लाख २८ हजार १९४ पुरुष तर १ लाख २८ हजार ७५८ स्त्री व इतर १ यांचा समावेश आहे. ६४-तिरोडा मतदार संघामध्ये २ लाख ६७ हजार ४३१ मतदार आहेत. यामध्ये १ लाख ३१ हजार ३५१ पुरुष तर १ लाख ३६ हजार ८० स्त्री व इतर शून्य यांचा समावेश आहे. ६५-गोंदिया मतदार संघामध्ये ३ लाख २० हजार ३३७ मतदार आहेत. यामध्ये १ लाख ५५ हजार ९२० पुरुष तर १ लाख ६४ हजार ४०८ स्त्री व इतर ९ मतदारांचा समावेश आहे. ६६-आमगाव एस.टी. राखीव मतदार संघामध्ये २ लाख ६६ हजार ७९२ मतदार आहेत. यामध्ये १ लाख ३२ हजार ७६२ पुरुष तर १ लाख ३४ हजार २८ स्त्री व इतर २ यांचा समावेश आहे.

सदर अंतिम मतदार यादी जिल्हा निवडणूक कार्यालय गोंदिया, संबंधित विधानसभा मतदार संघ ६३-अर्जुनी मोरगाव, ६४-तिरोडा, ६५-गोंदिया व ६६-आमगाव (डढ) येथे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय तसेच संबंधित मतदान केंद्रावर प्रसिध्द करुन सर्वसामान्य नागरिकांकरिता उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण अंबेकर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.